## रायगडातील पाच रोप-वे प्रकल्पांना शासनाची मंजुरी



**अलिबाग** : रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला नवे बळ देणाऱ्या पाच महत्त्वाकांक्षी रोप-वे प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यात घारापुरी (एलिफंटा) लेणी, अलिबाग किनारा ते कुलाबा किल्ला, नेरळ ते माथेरान, रायगड किल्ल्याचा पायथा ते रायगड किल्ला आणि अलिबागमधील श्री क्षेत्र कनकेश्वर डोंगर या स्थळांचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या पर्वतमाला अंतर्गत महाराष्ट्रात दुर्गम, डोंगराळ, गर्दीच्या पर्यटनस्थळांना जोडण्यासाठी ४५हून अधिक प्रकल्प प्रस्तावित आहेत. यापैकी १६ प्रकल्प राज्य सरकार स्वतः साकारणार असून उर्वरित २९ प्रकल्प केंद्र सरकारच्या माध्यमातून पीपीपी तत्त्वावर उभारले जाणार आहेत. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बांधकामाला सुरुवात होणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे रायगडमधील पर्यटन विकासाला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३४२
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ३० जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



### अंतरंग


सत्यमेव जयते फार्मर कप व्यापक जनचळवळ/२

खालापुरात होमगार्डला मारहाण; दोघांवर गुन्हा/५

पॉवरलिफ्टिंगमध्ये रायगडच्या खेळाडूंची दमदार कामगिरी/८


# नसरापूरच्या नराधमाला मृत्युदंड!



## न्यायालयाने भीमराव कांबळेला सुनावली फाशीची शिक्षा

पुणे : प्रतिनिधी

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (६५) याला न्यायालयाने सोमवारी (दि. २९) फाशीची शिक्षा सुनावली. विशेष म्हणजे राज्याच्या न्यायालयीन इतिहासात दोन महिन्यांत सुनावणी होऊन निकाली लागणारा हा पहिलाच खटला ठरला आहे.**

> आरोपीच्या कृत्यांमध्ये अत्यंत निर्दयीपणा दिसून येतो. तीन वर्षांच्या निष्पाप बालिकेवर केलेला हा अत्याचार अक्षम्य आहे. आरोपीला गुन्ह्याचा पश्चाताप झालेला दिसत नाही. त्याच्यावर दया दाखवण्यासारखे कोणतेही कारण नाही. सबळ पुरावे आरोपीविरुद्ध असल्याने त्याला मृत्युदंड देणे अपरिहार्य आहे. फाशीची शिक्षाही या गुन्ह्यासाठी अपुरी आहे, पण यापेक्षा मोठी शिक्षा कायद्यात उपलब्ध नाही.
>
> **–एस.आर. साळुंखे**, न्यायाधीश

महाराष्ट्रदिनी १ मे रोजी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला होता. या खटल्यात विशेष न्यायाधीश एस.आर. साळुंके यांच्या न्यायालयात २० जूनला अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी सरकार पक्ष, बचाव पक्ष आणि मूळ फिर्यादी यांनी आपली बाजू मांडली. यावेळी आरोपी भीमराव कांबळेला हजर करण्यात आले होते.

हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मीळ असून आरोपीने केलेले कृत्य घृणास्पद, क्रूर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे त्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी युक्तिवादात केली, तर बचाव पक्षाकडून अ‍ॅड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी बाजू मांडली. अखेर न्यायाधीशांनी नराधम कांबळे याला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, साक्षीदारांची साक्ष अशा विविध बाजूंनी तपास करून पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर १५ दिवसांत न्यायालयात १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रासह ५५पेक्षा जास्त साक्षीदारांचा जबाब, परिस्थितीजन्य पुरावे तसेच तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. विशेष न्यायालयात २१ मेपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी करणे संवेदनशील असल्याने बंद दाराआड (इन कॅमेरा) झाली. राज्याच्या इतिहासामध्ये अवघ्या ५८ दिवसांत खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन निकालावर शिक्कामोर्तब झाले.

### चिमुकलीच्या कुटुंबाला न्याय -मुख्यमंत्री

न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निकालावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'अशा नराधमांमुळे समाजातील सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यामुळे त्यांना कठोर शिक्षा मिळणे गरजेचेच होते. न्यायालयाने पीडित चिमुकलीच्या कुटुंबाला न्याय देत अतिशय योग्य निर्णय घेतला आहे. अशा नराधमांना समाजात राहण्याचा कुठलाच अधिकार नाही,' या कडक शब्दांत मुख्यमंत्र्यांनी आपली भावना व्यक्त केली तसेच खटला अत्यंत वेगवान पद्धतीने चालवून आरोपीला फाशीची शिक्षा सुनावल्याबद्दल न्यायालयाच्या या ऐतिहासिक व महत्त्वाच्या निर्णयाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.

### अनुसूचित जमातीच्या विशेष पदभरतीचा प्रश्न विधिमंडळात!

# प्रलंबित भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची मागणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांच्या विशेष पदभरतीचा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला होता. या प्रश्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर देत भरती प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करून रिक्त झालेल्या पदांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत. अद्ययावत माहितीनुसार अशा ६,८६० प्रकरणांपैकी १,५१४ पदांवर भरती पूर्ण झाली असून उर्वरित भरती नियमित प्रक्रियेद्वारे टप्प्याटप्प्याने सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या सन २०१७मधील निर्णयानुसार आदिवासी समाजासाठी राखीव रिक्त पदे भरण्याचे निर्देश देण्यात आले असून त्या अनुषंगाने राज्यात एकूण १२ हजार ५०० पदांची विशेष पदभरती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, मात्र गत सात वर्षांत




केवळ एक हजार ३४३ पदांची भरती पूर्ण झाली असून ११ हजार २२७ पदांची भरती अद्यापही प्रलंबित असल्याकडे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

प्रश्नात नमूद करण्यात आले आहे की, १४ डिसेंबर २०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत आदिवासींसाठी राखीव जागांवर निवड झालेल्या परंतु वैध आदिवासी प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करण्याचे निर्देश दिले होते. त्यातून रिक्त झालेल्या पदांवर आदिवासी समाजातील पात्र उमेदवारांसाठी विशेष भरती राबवून गट 'क' आणि गट 'ड'ची पदे ३१ जुलै २०२३पर्यंत भरण्याचे नियोजन करण्यात आले होते, मात्र या निर्णयानंतरही विशेष भरती प्रक्रिया अपेक्षित गतीने राबविण्यात आली नाही. आदिवासी समाजातील तरुणांनी वारंवार पाठपुरावा करूनही ही भरती प्रक्रिया रखडलेली असून मे २०२६पर्यंतही मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आल्याचे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी प्रश्नातून नमूद केले तसेच शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून प्रलंबित ११ हजार २२७ पदांची विशेष भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे किंवा पुढे कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे, असा तारांकित प्रश्न दाखल केला होता. या प्रश्नाच्या माध्यमातून आमदारद्वयींनी विशेष पदभरतीची प्रलंबित प्रक्रिया गतीने पूर्ण करून अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र तरुणांना न्याय मिळावा, अशी मागणी शासनाकडे केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरातून सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने ६ जुलै २०१७ रोजी चेअरमन, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफसीआय)विरुद्ध जगदीश बलाराम बहिरा या प्रकरणात दिलेल्या निर्णयानंतर शासनाने ५ जून २०१८ रोजी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. **(पान २ वर..)**

## उरणच्या विकासासाठी आमदार महेश बालदी यांचा औचित्याचा मुद्दा



**मुंबई** : उरण नगर परिषदेला लागून असलेल्या दारूगोळा डेपोच्या ५०० मीटर सेफ्टी झोनमुळे गेल्या अनेक वर्षांपासून उरण शहराच्या विकासात मोठे अडथळे निर्माण झाले आहेत. जनतेच्या हिताचा आणि अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा प्रलंबित प्रश्न उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे अत्यंत आक्रमकपणे उपस्थित केला.

या महत्त्वपूर्ण प्रश्नावर प्रकाश टाकताना आमदार महेश बालदी यांनी स्पष्ट केले की, संरक्षण विभागाच्या या ५०० मीटरच्या निर्बंधांमुळे स्थानिक नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून शहराच्या पायाभूत सुविधा आणि विस्तार पूर्णपणे रखडला आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय संरक्षणमंत्र्यांशी चर्चा करताना उरणचा सेफ्टी झोन प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची तसेच उरण शहराचा प्रलंबित विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर व्हावा यासाठी नगरविकास विभागाने तत्काळ आवश्यक ती बैठक आयोजित करावी आणि त्यातील सर्व तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करून या आराखड्याला मंजुरी द्यावी, अशी मागणीही यावेळी केली.

## निवडक

### सीबीएसई बोर्डाकडून त्रिभाषा धोरणांतर्गत मार्गदर्शक तत्त्वे जारी

**नवी दिल्ली** : सीबीएसई बोर्डाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत लागू करण्यात आलेल्या त्रिभाषा धोरणाबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत, ज्यानुसार नवीन भाषा धोरण दहावीच्या सध्याच्या विद्यार्थ्यांवर लागू होणार नाही, तथापि इयत्ता सातवी, आठवी आणि नववीमधील ज्या विद्यार्थ्यांनी आधीच दोन परदेशी भाषांची निवड केली आहे, ते विद्यार्थी त्या भाषांचा अभ्यास सुरू ठेवू शकतात, मात्र त्यांना त्यासोबतच एका भारतीय भाषेचाही अभ्यास करणे आवश्यक असेल.

### विधान परिषद उपसभापती पदाची उद्या निवडणूक

**मुंबई** : महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त असलेल्या उपसभापतीपदाची निवडणूक १ जुलै रोजी पार पडणार आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सोमवारी (दि.२९) सभागृहात या निवडणुकीच्या अधिकृत तारखेची घोषणा केली. माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांची सदस्यत्वाची मुदत संपल्यापासून हे पद रिक्त आहे. संख्याबळाचा विचार करता विधान परिषदेत सध्या सत्ताधारी महायुतीकडे स्वतःचे ५६ आमदारांचे भक्कम असे बळ आहे.

## आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक तथा खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शरद कदम यांनी सोमवारी (दि.२९) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत कदम यांचे पक्षात स्वागत करण्यात आले.

शरद कदम यांनी कबड्डी क्षेत्रात प्रशिक्षक म्हणून उल्लेखनीय कार्य करत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. त्याचबरोबर तांबाटी ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून काम करताना त्यांनी गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले. सामाजिक, क्रीडा आणि सार्वजनिक क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवामुळे ते खालापूर तालुक्यात एक सक्रिय आणि लोकप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शरद कदम यांचे पक्षात स्वागत करत त्यांच्या क्रीडा, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातील अनुभवाचा भाजपला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला. समाजातील विविध घटकांना जोडण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही शरद कदम यांच्या पक्षप्रवेशाचे स्वागत करत त्यांच्या सहभागामुळे खालापूर तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद आणखी वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी खालापूर तालुका अध्यक्ष सन्नी यादव, हरिभाऊ जाधव, रवी पाटील, विठ्ठल मोरे आदी उपस्थित होते.

## सिया, चेतनच्या पोलीस कोठडीत वाढ

**पुणे : प्रतिनिधी**

लोहगडावर झालेल्या बहुचर्चित केतन अग्रवाल खूनप्रकरणी त्याची भावी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन यांच्या पोलीस कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

सिया आणि चेतन यांची पोलीस कोठडी सोमवारी (दि.२९) संपत असल्याने वडगाव मावळ न्यायालयात हजर करण्यात आले होते. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने ३ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

## राज्यात १५ ऑगस्टपर्यंत पावसाळी मासेमारी बंदी



**मुंबई** : राज्यातील मत्स्यसाठ्याचे जतन करण्यासाठी पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीत १५ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी (दि. २९) विधानसभेत यासंदर्भात निवेदन केले.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, केंद्र शासनाच्या धोरणानुसार १ जून ते ३१ जुलै असा ६१ दिवसांचा बंदी कालावधी निश्चित करण्यात आला होता. यानुसार राज्य शासनाने यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना या काळात बंदी घातली होती, मात्र मासेमारी हंगामाच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर लहान माशांची (बीज) मासेमारी होते, ज्याचा फटका मत्स्योत्पादनाला बसतो. त्याला अटकाव करण्यासाठी पावसाळी मासेमारी बंदी कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात यावा, अशी मागणी विविध मच्छीमार सहकारी संस्थांनी सरकारकडे केली होती. त्यानुसार शासनाने बंदी कालावधी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

## पुढील वर्षापासून टीईटी परीक्षा ऑनलाइन –शिक्षणमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर आता परीक्षेची नवीन तारीख महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. आगामी काळात असे प्रकार रोखण्यासाठी आता ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याबाबत सरकारने तयारी सुरू केली आहे, अशी माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत दिली.



टीईटी पेपरफुटीच्या प्रकरणावर सोमवारी विधिमंडळात चर्चा झाली. यावेळी बोलताना शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी म्हटले की, टीईटी पेपरफुटीबाबत माहिती मिळताच पेपर विक्री करण्यासाठी येणाऱ्या तिघांना पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे टीईटीचे पेपर आढळले. राजू प्रयाग शाम आणि आणखी दोघांवर भिवंडी कोनगाव येथे गुन्हा दाखल केला आहे.

पुढे बोलताना मंत्री भुसे यांनी सांगितले की, मोठी रक्कम घेऊन हे पेपर विक्री करणार होते. या गुन्ह्यात तीन आरोपींना २७ तारखेला अटक केली आहे. प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन ठाणे पोलीस आयुक्तांच्या गुन्हे शाखेमार्फत एसआयटी स्थापन केली आहे. हरियाणा, बिहार आणि दिल्लीला तपासासाठी पथके रवाना झाली आहेत. या प्रकरणात मकोका लावण्यासंदर्भात तपासणी सुरू आहे.

आता फेरपरीक्षेसाठी कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. पुढील परीक्षा पारदर्शक आणि ऑनलाइन घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली जाणार आहे, असेही शिक्षणमंत्री भुसे यांनी सांगितले.

# 'पुरवैय्या'च्या सुरेल सुरांनी पनवेलकर चिंब!

### एसडी, आरडींच्या गीत रचनांची झालमुरीसह सांगीतिक मैफल





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पश्चिम बंगालने हिंदी चित्रपटसृष्टीला अनिल विश्वास, सलील चौधरी, सचिनदेव बर्मन, राहुलदेव बर्मन, हेमंत कुमार आणि किशोर कुमार यांसारखे दिग्गज संगीतकार, गायक दिले. त्यांच्या अजरामर सुरांनी अनेक पिढ्यांच्या भावना व्यक्त करत भारतीय संगीतविश्व समृद्ध केले आहे. या सुवर्णकाळातील कालातीत गीतांचा सुरेल प्रवास उलगडणारा 'पुरवैय्या' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या वतीने, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख सहयोगाने तसेच वाय नॉट प्रॉडक्शन, फॅबल फॅक्टरी यांच्या वतीने येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात सादर झाला.

बांगला संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या मधुर हिंदी गीतांचा अनोखा सुरेल प्रवास या कार्यक्रमातून सादर करण्यात आला. सुरेल गायन, अप्रतिम वाद्यसंगत आणि भावपूर्ण सादरीकरणामुळे उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने संगीतप्रेमी उपस्थित होते. प्रत्येक गीताला रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

सुरेल संगीत, जुन्या आठवणी आणि दर्जेदार सादरीकरण यांचा संगम असलेला 'पुरवैय्या' हा कार्यक्रम पनवेलकर रसिकांसाठी एक आगळावेगळा आणि अविस्मरणीय सांगीतिक अनुभव ठरला. हरहुन्नरी कलाकार पुष्कर क्षोत्री यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या सांगीतिक मैफलीने एस.डी. बर्मन, आर.डी. बर्मन आणि इतर दिग्गज संगीतकारांच्या गाजलेल्या गीतांनी सभागृहात अविस्मरणीय वातावरण निर्माण झाले.

या सांगीतिक सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, भाजपचे प्रवक्ते आणि उपाध्यक्ष केशव उपाध्ये, प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, **(पान २ वर..)**

## पावसाचा पिकांना दिलासा



**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाच्या आगमनानंतर खरीप हंगामातील पेरणीला शेतकऱ्यांनी सुरुवात केली असून शेतात पेरलेल्या बियाण्यांना अंकुर फुटला आहे. दोन दिवसांपूर्वी बरसलेला पाऊस अचानक थांबल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. अंकुरलेल्या पिकांना पुढील वाढीसाठी पावसाची अत्यंत गरज असताना पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

धान्याची कमतरता पडू नये तसेच गुरांसाठी वैरण यासाठी आजही ग्रामीण भागात शेतकरी आवर्जून शेती करतात. मजुरांची वानवा, बियाणे-खतांची जुळवाजुळव अशा आव्हानांवर मात करीत पिकाची लागवड केली जाते, मात्र पाऊस खंड देत असल्याने शेतकरी हवालदिल होत आहेत.

सध्या पिकाच्या वाढीसाठी नियमित आणि समाधानकारक पावसाची आवश्यकता आहे. यामुळे पावसाने सातत्याने आणि दमदार बरसून खरीप हंगामाला बळ द्यावे, अशी प्रार्थना बळीराजा वरुणराजाकडे करीत आहे.

# सत्यमेव जयते फार्मर कप शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' ही केवळ स्पर्धा नसून महाराष्ट्रातील शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास हेच त्याचे सर्वात मोठे यश आहे. आजचे १८ हजार शेतकरी गट पुढील काळात ५० लाख शेतकऱ्यांना एकत्र आणतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्षा निवासस्थानी पानी फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित फार्मर कपच्या शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, पाणी फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान, अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यावेळी उपस्थित होते. झूम लिंकद्वारे राज्यातील शेतकरी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी स्मार्ट शेती ॲपचे लोकार्पण करण्यात आले. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी २६ ऑगस्ट २०२५पासून राज्यभरात ४६ तालुक्यात सुरू असलेल्या फार्मर कपच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वासच भविष्यातील कृषी परिवर्तनाचा पाया ठरेल.फार्मर कपमधील १८ हजार शेतकरी गट हे महाराष्ट्रातील शेती क्रांतीचे शिल्पकार ठरणार आहेत, त्यांच्या अनुभवातून लाखो शेतकरी प्रेरणा घेतील. विधानमंडळात महिला शेतकरी विधेयक मंजूर करण्यात येणार आहे. शेतीच्या मालकीमध्ये नाव नसलेल्या महिलांनाही अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता दिली जाणार आहे. मागील वर्षी फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या गटांमध्ये सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांच्या उत्पादनात सरासरी ७१ टयांनी वाढ झाली. सामूहिक खरेदीमुळे कृषी निविष्ठांवर १,५८४ कोटी रुपयांची बचत झाली, तर सामूहिक श्रमांमुळे एकरी सुमारे ६ हजार रुपयांची मजुरीची बचत झाली. गटशेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारे देशातील पहिले राज्य ठरत आहे. 'महाविस्तार ॲप' आणि 'फार्मर कप'मधील माहिती एकत्रित करून शेतकऱ्यांना अधिक प्रभावी मार्गदर्शन करण्यात येईल. फार्मर कपमधून मिळालेल्या अनुभवांच्या आधारे राज्याच्या कृषी धोरणांमध्येही आवश्यक बदल करण्यात येतील. राज्य शासनाच्या विविध योजनांचे एकत्रित नियोजन (कन्व्हर्जन्स) केल्यास गटशेती अधिक सक्षम होईल. यावर्षी अल निनोमुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या सर्व संरचनांची तातडीने दुरुस्ती, गाळ काढणे आणि पाणीसाठा वाढविण्याची कामे हाती घ्यावीत, जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमुळे पूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीत मोठा दिलासा मिळाला होता, असे त्यांनी सांगितले.

# मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आजपासून घरभेटीवर

## मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यभरात मंगळवारपासून (दि. ३०) विशेष सखोल मतदार पुनरीक्षण कार्यक्रम राबविला जाणार आहे. मतदान केंद्र स्तरीय अधिकारी आजपासून मतदारांच्या घरभेटीवर येणार आहेत. रायगड जिल्ह्यात २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार आहेत. यातील ६५.९५ टक्के मतदारांची २००२च्या मतदार यादीशी यशस्वीपणे जोडणी झाली आहे. ३५ टक्के मतदारांची जोडणी शिल्लक आहे. १५ टक्के मतदारांच्या जोडणीत काही त्रृटी आढळून आल्या आहेत. या सर्व मतदारांची पुढील महिन्याभरात पडताळणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी पत्रकारपरिषदेत दिली.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमा अंतर्गत ३० जून पासून मतदान केंद्र स्तरावरील अधिकारी घरोघरी भेटी देणार आहेत. या दरम्यान मतदारांच्या पात्रतेची सखोल तपासणी केली जाणार आहे. २००२ च्या मतदार यादीशी जोडणीकरून मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यात अपात्र आढळून येणाऱ्या मतदारांची नावे वगळली जाणार आहेत. २००२ मधील यादीशी जोडणी न झालेल्या मतदारांना या गणना प्रपत्र भरून द्यावे लागणार आहे. मतदारांनी केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

पनवेल आणि उरण मतदारसंघात सर्वाधिक जोडणी न झालेले मतदार आहेत. तर महाड, श्रीवर्धन आणि अलिबाग विधानसभा मतदार संघात सर्वाधिक जोडणी झालेले मतदार आहेत. जिल्ह्यात २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार आहेत. यातील ६५.९५ टक्के मतदारांची २००२च्या मतदार यादीशी यशस्वीपणे जोडणी झाली आहे. ३५ टक्के मतदारांची जोडणी शिल्लक आहे. १५ टक्के मतदारांच्या जोडणीत काही त्रृटी आढळून आल्या आहेत. या सर्व मतदारांची पुढील महिन्याभरात पडताळणी केली जाणार आहे.

मतदारांकडून अथवा त्यांच्या कुटूंबियांकडून गणना प्रपत्र भरून घेतले जाणार आहे. ते भरून देणे मतदारांना बंधनकारक असणार आहे. ज्या मतदारांची जोडणी झालेली नाही. त्यांना २००२ मध्ये त्यांचे मतदार यादीत नाव कुठे होते हे सांगून केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांना ते शोधण्यासाठी मदत करावी लागणार आहे. अन्यथा अपात्र मतदारांची नावे मतदान यादीतून वगळली जाणार आहेत असा इशारा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे.

घरभेटीसाठी येणाऱ्या केंद्रस्तरीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये रंगला 'गांधर्व मंच'चा राष्ट्रीय स्वरसंग्राम

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गांधर्व मंच या राष्ट्रीय स्तरावरील भारतीय शास्त्रीय संगीत आणि संतरचित अभंग गायन स्पर्धेचा नुकताच दिमाखात समारोप झाला

या राष्ट्रीय स्तरावरील भारतीय शास्त्रीय संगीत आणि संतरचित अभंग गायन व पखवाज सोलो वादन या स्पर्धेत पखवाज वादन प्रकारात पंडित मृणाल मोहन उपाध्याय यांचे शिष्य.अंशुल नंदन म्हात्रे,सत्यम ज्ञानेश्वर खैरे यांनी प्रथम क्रमांक व प्रशांत कांतीलाल घरत यांनी द्वितीय क्रमांक पटकावत सुयश संपादन केलेआहे. यांनी आपल्या बहारदार वादनाने परीक्षकांची आणि रसिकांची दाद मिळवली.

या उत्कृष्ट सादरीकरणासाठी यांना देशात "प्रथम व द्वितीय क्रमांक" एकाच घराण्यात या दैदिप्यमान यशाबद्दल यांना विशेष प्रमाणपत्र चषक आणि रोख रक्कम खासदार शरद पवार, श्रीरंग बारणे, अवधुत गुप्ते, सदानंद मोरे यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते भाल विठ्ठलवाडी रस्त्याचे लोकार्पण

**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना जिल्हा रायगड अंतर्गत पेण तालुक्यातील मुख्य जिल्हा रस्ता २३ ते भाल विठ्ठलवाडी काँक्रिट रस्त्याचा लोकार्पण सोहळा आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला या कामाची लांबी ४.५० किमी आहे व या कामासाठी ८.५० कोटी इतका निधी टाकून हे काम पूर्ण केले आहे.

या लोकार्पण सोहळ्यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की,पेण तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते हे मूळ रस्त्यांना जोडण्यात आले असून पेण तालुक्याचा विकास हाच माझा ध्यास आहे .देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्या आशीर्वादाने विकासाची कामे मी पूर्ण करत आहे या भागातील जनतेने मला भरभरून प्रेम दिले आशीर्वाद दिले व यामुळेच मी येथील जनतेचा आभार मानतो व यापुढेही अशीच विकासकामे या भागात होतील अशी ग्वाही देतो

या कार्यक्रमाला धैर्यशील पाटील ,सभापती जिल्हा परिषद वैकुंठ पाटील.नगराध्यक्षा प्रीतम पाटील ,सदस्य प्रभाकर म्हात्रे ,जनार्दन भस्मा ,सभापती पेण पंचायत समिती स्मिता पाटील सदस्य ताई जोमा दरवड, उपसभापती संजय डगर विवेक म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, अस्मिता पाटील, सुशांत खाकर ,कमल पवार,पूजा पाटील, श्रीकांत पाटील भाग्यश्री म्हात्रे संदेश ठाकूर, जितु म्हात्रे वसंत ठाकूर अँड नंदकुमार म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, विजय पाटील आदी उपस्थित होते.

# उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये मानसिक आरोग्य विषयावर मार्गदर्शन

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**




उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये इयत्ता ८वी, ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आल होते.या सत्रात समुपदेशक उर्वशी सेठ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन, परीक्षा काळातील दडपण, भावनांवर नियंत्रण, सकारात्मक विचारसरणी आणि आत्मविश्वास वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या शंका मोकळेपणाने मांडल्या. त्यावर उर्वशी सेठ यांनी योग्य सल्ला देत मानसिक आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे विद्यार्थ्यांना तणावमुक्त राहण्यासाठी आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्यासाठी उपयुक्त माहिती मिळाली.

शाळेच्या प्राचार्या, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे मार्गदर्शन सत्र नियमितपणे आयोजित करण्यात येणार असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले. शाळा उलवे येथील सीबीएसई संलग्न संस्था असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवित असते.

# उत्पन्न वाढवा, अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांनी एसटीतील अधिकाऱ्यांना दिला अल्टिमेटम

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नात अपेक्षित वाढ करण्यात अपयशी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत उत्पन्न वाढीसाठी ठोस परिणाम दिसून आले नाहीत, तर संबंधित अधिकाऱ्यांवर बदली, पदावनती अथवा निलंबनासारखी कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्या मान्य करून मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता व्यवस्थापन आणि अधिकारी वर्गानेही आपल्या जबाबदारीचे भान ठेवून उत्पन्न वाढीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ बैठका घेऊन किंवा कागदोपत्री नियोजन करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष परिणाम दिसला पाहिजे.

यंदाच्या एप्रिल आणि मे महिन्यात, भाडेवाढ लागू असूनही एसटीला मोठा तोटा सहन करावा लागला आहे. वर्षातील सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या या दोन महिन्यांतील ही घसरण गंभीर असून ती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही. राज्यातील ३१ पैकी २१ विभाग तोट्यात जाणे ही व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

**विशेष तपास पथकाची नियुक्ती**

महाव्यवस्थापक माहिती व तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्याद्वारे एसटी महामंडळाती आर्थिक अफरातफर अथवा अनियमिततेची सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

प्रत्येक आगार, विभाग, प्रादेशिक कार्यालय आणि मुख्यालयातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन केले जाणार आहे. प्रवासी वाढ, उत्पन्नवाढ, फेऱ्यांचे नियोजन, खर्च नियंत्रण, बसचा कार्यक्षम वापर आणि स्थानिक स्तरावरील नाविन्यपूर्ण उपक्रम या सर्व बाबींचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल.

"एसटीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अधिकारी वर्गाने आता निकाल देण्याची वेळ आली आहे. काम करणाऱ्यांना संपूर्ण पाठबळ मिळेल; मात्र अकार्यक्षमता, उदासीनता आणि निष्क्रियता खपवून घेतली जाणार नाही. एक महिन्यानंतर कामगिरीच्या आधारे निर्णय घेतले जातील आणि आवश्यक असल्यास बदली, पदावनती किंवा निलंबनासारखी कठोर कारवाई करण्यात येईल," असा ठाम इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.

पान १ वरुन

## प्रलंबित भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची मागणी

या शासन निर्णयाविरोधात नागपूर खंडपीठात याचिका दाखल झाली होती. शासनाने न्यायालयात सादर केलेल्या प्रारंभिक माहितीनुसार १५ जून १९९५ ते ३१ ऑगस्ट २०१५ या कालावधीत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित पदांवर नियुक्त झालेले, मात्र जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले १२,५२० कर्मचारी असल्याचे नमूद करण्यात आले होते. तथापि २१ डिसेंबर २०१९च्या शासन निर्णयानुसार सर्व विभागांकडून अद्ययावत माहिती घेतल्यानंतर ही संख्या प्रत्यक्षात ६,८६० असल्याचे स्पष्ट झाले. यापैकी १,५१४ पदांवर भरती पूर्ण करण्यात आली आहे तसेच १४ डिसेंबर २०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागाने आदिवासींसाठी राखीव पदांवर नियुक्ती मिळालेल्या पण जातवैधता प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करून रिक्त झालेल्या जागांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांची विशेष भरती करण्याचा निर्णय घेतला होता.

गट 'क' व गट 'ड'ची पदे ३१ जुलै २०२३पर्यंत भरण्याचेही निर्देश देण्यात आले होते. मुख्यमंत्र्यांनी उत्तरात स्पष्ट केले की, जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या किंवा सादर न करू शकलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग केल्यानंतर रिक्त झालेल्या पदांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत. या पदांची भरती नियमित पदभरती प्रक्रियेद्वारे सुरू असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## 'पुरवैय्या'च्या सुरेल सरींनी पनवेलकर चिंब!

नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि मोठ्या संख्येने संगीतप्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमात गायक अजित परब, गायिका अर्चना गोरे आणि मुक्ता जोशी यांनी अजरामर गाण्यांचे प्रभावी सादरीकरण केले, तर निवेदक पुष्कर क्षोत्री व योगिनी पोफळे यांनी प्रत्येक गीतामागील रंजक कथा, आठवणी आणि संदर्भ रसिकांसमोर उलगडत कार्यक्रमाची रंगत अधिक खुलवली. प्रत्येक सादरीकरणानंतर दणाणून उठणाऱ्या टाळ्या आणि 'वन्स मोअर'च्या आरोळ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे अधोरेखित केले.

मध्यंतरात प्रेक्षकांसाठी पश्चिम बंगालची प्रसिद्ध झालमुरी ही चटकदार खाद्य मेजवानीही होती. त्यामुळे सुरेल संगीतासोबतच बंगाली चवीचाही अनोखा अनुभव उपस्थितांना घेता आला. झालमुरीचा खमंग स्वाद आणि एसडी-आरडी यांच्या अजरामर सुरांची जादू यांचा अनोखा संगम घडवून आणणाऱ्या 'पुरवैय्या' कार्यक्रमाने पनवेलकरांना अविस्मरणीय सांगीतिक पर्वणीचा आनंद दिला. पनवेलच्या सांस्कृतिक जीवनात सातत्याने दर्जेदार कार्यक्रमांची भर घालण्याच्या या प्रयत्नांमुळे शहराचे सांस्कृतिक वैभव अधिक समृद्ध होत असल्याची भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली.



# कर्जतच्या सांगवीत स्लॅब कोसळला

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील सांगवी येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास दोन मजल्याचे लोडबेरिंग स्ट्रक्चर कोसळल्याने भीषण अपघात झाला.

सनाधरा रिसॉर्टच्या बांधकामस्थळी महिनाभरापूर्वी टाकलेला स्लॅब अचानक कोसळल्याने वेल्डिंगचे काम करणारा उत्तर भारतीय कामगार तिसऱ्या मजल्यासह खाली पडला. यावेळी त्याचा पाय लोखंडी बीममध्ये अडकल्याने तो गंभीर अवस्थेत अडकून पडला. खोपोली येथील हेल्प फाउंडेशन रेस्क्यू टीमने पाच तास शर्थीचे प्रयत्न करून या कामगाराला बाहेर काढले.

सनाधरा रिसॉर्टच्या बांधकाम स्थळी महिनाभरा पूर्वी टाकलेला स्लॅब अचानक कोसळल्याने वेल्डिंगचे काम करणारा उत्तर भारतीय कामगार मनोज त्यामध्ये अडकला या घटनेची माहिती मिळताच खोपोली येथील हेल्प फाउंडेशन रेस्क्यू टीमचे गुरुनाथ साठेलकर आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले.

अत्यंत धोकादायक परिस्थितीत तब्बल पाच तास शर्थीचे प्रयत्न करून त्यांनी मनोजला सुरक्षित बाहेर काढले. घटनास्थळी कर्जत पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक किरण नवले, अनिल सोनोने व त्यांचे पथकही उपस्थित होते. या अपघातात तीन स्थानिक आदिवासी कामगारसुद्धा किरकोळ जखमी झाले असून त्याच्यावर कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

## 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांचे प्रतिपादन

## गव्हाण विद्यालयात मोफत वह्यावाटप कार्यक्रम उत्साहात






**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार, दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर हे विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पार्टी उलवे नोड-२ च्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी (दि. २९) करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना देशमुख यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रमाची कास धरून विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हावे व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रमाणे अपार कष्ट व मेहनत करून यशस्वी होऊन लोकहिताचा व दातृत्वाचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, साहित्य, क्रीडा व आरोग्य आदी विविध क्षेत्रांत भरीव कार्य करून समाजातील उपेक्षित, वंचित, गरजू व होतकरूंना आर्थिक पाठबळातून स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी ३० वर्षांपासून अविश्रांतपणे उल्लेखनीय काम करणाऱ्या पनवेल येथील रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वितरित केले जाते. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी रयत शिक्षण संस्थेच्या येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप मंडळाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे आदींची समयोचित भाषणे झाली. तर प्रास्ताविक भाषणात विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आणि संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर यांनी मंडळाच्या एकूण कार्याचा आढावा घेऊन कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, रतन भगत, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय नाना घरत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच सुहास भगत, विनायक कोळी, सुदर्शन घरत, जयवंतराव देशमुख, भाऊ भोईर, सुभाष गोंधळी, प्रतिश पाटील, गणेश पाटील, धीरज ओवळेकर, निलेश खारकर, शैलेश भगत, किशोर पाटील, राजेश पाटील, चेतन पाटील, विराज देशमुख, अनिल कोळी, जयश्री घरत, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, गव्हाण पंचक्रोशीतील सर्व सामाजिक कार्यकर्ते या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप झाले.

प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक व रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर यांनी, तर सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने सोहळा यशस्वी झाला.

### मान्यवरांचा विशेष सत्कार

यावेळी ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल वाय.टी. देशमुख व विजय नाना घरत यांचा, तर विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीच्या सदस्यपदी पुनर्निवड झाल्याबद्दल विश्वनाथ कोळी व अनंता ठाकूर यांचा विद्यालयाच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला तसेच विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर यांची संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल यथोचित सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल उपशिक्षिका दर्शना माळी यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# पनवेल रेल्वेस्थानकात प्रवाशांमध्ये जनजागृती अभियान

## सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**



जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने पनवेल रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे अमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर फसवणुकीपासून बचाव तसेच सुरक्षित रेल्वे प्रवासाबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हातात जनजागृती फलक घेऊन प्रवाशांशी संवाद साधला. कोणतेही अमली पदार्थ शरीरासाठी घातक असून त्याचा परिणाम केवळ व्यसनाधीन व्यक्तीवरच नव्हे तर संपूर्ण कुटुंबावर होत असल्याचे सांगण्यात आले. तसेच भारतातील एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत अमली पदार्थांचे सेवन व बेकायदेशीर व्यवहार हा दंडनीय गुन्हा असल्याची माहिती देण्यात आली. रेल्वे प्रवासादरम्यान अनोळखी व्यक्तीकडून खाद्यपदार्थ किंवा पेय स्वीकारू नये. अमली पदार्थांची वाहतूक किंवा सेवन आढळल्यास रेल्वे पोलीस हेल्पलाइन १५१२ तसेच अमली पदार्थ हेल्पलाइन १९३३ वर तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी ओटीपी, यूपीआय पिन किंवा बँकेची गोपनीय माहिती कोणाला देऊ नये, अज्ञात लिंक किंवा क्यूआर कोड स्कॅन करू नये, सार्वजनिक फ्री वायफाय वापरताना सतर्क राहावे, संशयास्पद कॉल-संदेशांवर विश्वास ठेवू नये, अशा सूचना देण्यात आल्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या अभियानात गोपनीय शाखेचे अंमलदार जाकीर शेख, दोन पोलीस उपनिरीक्षक व २२ पोलीस अंमलदार सहभागी झाले. प्रवाशांनी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समाजघडणीसाठी जनजागृती मोहिमा प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त केले. फसवणूक झाल्यास राष्ट्रीय हेल्पलाइन १९३० तसेच महाराष्ट्र सायबर हेल्पलाइन १९४५वर संपर्काचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

## पनवेलला बाळा कुंभार, तर उरणला पृथ्वीराज घोरपडे

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपनिरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी जारी केले आहेत. प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे विविध पोलीस ठाण्यांमध्ये नव्याने जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.



कर्तव्यदक्ष, अनुभवी आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेले पोलीस निरीक्षक बाळा रघुनाथ कुंभार यांची पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस निरीक्षकपदी, तर उरण पोलीस ठाण्याच्या वपोनि.पदी पृथ्वीराज घोरपडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मूळचे सातारा जिल्ह्यातील असलेले बाळा कुंभार यांनी २००५मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात प्रवेश केला. गेल्या दोन दशकांहून अधिक काळात त्यांनी विविध ठिकाणी उल्लेखनीय सेवा बजावत सक्षम, शिस्तप्रिय आणि जनतेशी प्रभावी संवाद साधणारे अधिकारी अशी ओळख निर्माण केली आहे.

सध्या ते नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेत सीसीटीएनएस अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्याआधी त्यांनी ठाणे ग्रामीण पोलीस दलांतर्गत पडघा पोलीस ठाणे तसेच कल्याण तालुक्यातील टिटवाळा पोलीस ठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली.

या बदल्यांमुळे पोलीस प्रशासन अधिक सक्षम व गतिमान होण्यास मदत होणार असून संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# एचएसआरपी नंबरप्लेट बसवा; ...अन्यथा १ जुलैपासून कडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (HSRP) बसविण्यासाठी ३० जून ही अंतिम मुदत असून, त्यानंतर १ जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्त्वाची कामेही रोखण्यात येणार आहेत.

एचएसआरपी नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांना वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल तसेच परवाना नूतनीकरण यांसारख्या आरटीओमधील सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी ही अट लागू राहणार नाही. दरम्यान, ३० जूनपर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना १ जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे. राज्यात एचएसआरपी बसविण्याच्या कामासाठी तीन झोन निश्चित करण्यात आले असून, झोन १ साठी रोझमेर्टा टेक्नॉलॉजीज लिमिटेड, झोन २ साठी रिअल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि झोन ३ साठी एफटीए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रा. लि. या कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाने एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृत दरही निश्चित केले आहेत. त्यानुसार दुचाकीसाठी ४५० रुपये, तीनचाकीसाठी ५०० रुपये, तर हलकी मोटार वाहने आणि मध्यम व अवजड व्यावसायिक वाहनांसाठी ७४५ रुपये (जीएसटी वगळून फिटमेंट शुल्कासह) आकारण्यात येईल. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० व मोटार वाहन अधिनियमातील कलम १७७ अन्वये पोलीस व परिवहन विभाग संयुक्त किंवा स्वतंत्रपणे कारवाई करणार आहेत. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनीही त्यांच्या ताब्यातील वाहनांवर ३० जूनपूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवावेत, असे आवाहन परिवहन विभागाचे सहआयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये उद्या मोफत वह्यावाटप

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी (दि. १) आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम पनवेल येथील गुरुलिंगेश्वर शाळा, पनवेल एम.टी. डेपो परिसर येथे पार पडणार आहे.

रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करून शिक्षणाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. रिपब्लिकन चळवळीचे नेते नरेंद्र गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या कार्यक्रमाचे आयोजन स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे आणि पनवेल शहर अध्यक्ष प्रशांत सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

# उरण शहरात वटपौर्णिमेचा उत्साह



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात वटपौर्णिमेनिमित्त सर्वत्र महिलावर्ग वटवृक्षाची पूजा करीत असताना दिसत होते. त्याचप्रमाणे उरण शहरातील देवूळवाडी, बोरी नाका, कोट नाका, द्वारका नगरी, केगाव, नागाव, मोरा, राघोबा देव मंदिराजवळ तसेच उरण तालुक्यात सर्वत्र वटवृक्षाची पूजा करीत असताना महिलावर्ग दिसत होता.

वटपौर्णिमा म्हणजे वटवृक्षाची आज महिलावर्ग यथासांग पूजा करीत असतात. उरण शहरातील देवूळवाडी येथे महिलांनी वडाच्या झाडाची पूजा केली. आंबे, फणस गरे, आवळे, केळी, सफरचंद, जांभळे, आलूबुखार व इतर फळे वाहून यथासांग पूजा केली. वडाच्या झाडाला धागा बांधून सात फेऱ्या मारून जन्मोजन्मी हाच पती मिळो व आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावे अशी प्रार्थना करून महिलांनी एकमेकींना वाण म्हणून फळे देऊन वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. सचिन उपाध्ये महाराजांनी महिलांना यथासांग पूजा सांगितली.

# पनवेल मनपा हद्दीत मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण

## बीएलओंना सहकार्य करण्याचे आयुक्त चितळे यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ कार्यक्रमांतर्गत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घरोघरी बूथ लेव्हल अधिकारी (BLO) भेट देणार आहेत. यावेळी नागरिकांनी प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे यांनी केले.

मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष सखोल पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. घरभेटीदरम्यान बीएलओंकडून आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी केली जाणार असल्याने नागरिकांनी त्यांना योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे. आवश्यक कागदपत्रे "घरभेटीपूर्वी नागरिकांनी voters.eci.gov.in किंवा ECINet App वर स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून ठेवावा. बीएलओंकडून देण्यात येणारा गणना अर्ज काळजीपूर्वक भरून त्यावर स्वाक्षरी करून एक प्रत बीएलओंकडे द्यावी व दुसरी प्रत स्वतःकडे सुरक्षित ठेवावी.



**पनवेल : शेलघर येथील जि.प. शाळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, श्रीधर भगत आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.**

# वीर वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे आणि प्रथम फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये आयोजित करण्यात आलेल्या मल्टी फंक्शनल ऑफिस आणि नर्सिंग कोर्स यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मल्टी फंक्शनल ऑफिस आणि जनरल अटेंडंट-नर्सिंग कोर्सचे आजच्या रोजगाराभिमुख शिक्षणामधील महत्त्व अधोरेखित केले. आरोग्य सेवा क्षेत्रात तसेच कार्यालयीन व्यवस्थापनाशी संबंधित विविध संधी उपलब्ध करून देणारा हा कोर्स विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग करून स्वतःच्या करिअरच्या संधी अधिक व्यापक कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. सदर कोर्सच्या प्रत्येकी दोन बॅचच्या यशस्वी अंमलबजावणी आणि पूर्ततेसाठी पूजा ठाकूर, पुष्पा गायकवाड व जयवंती गोंधळी यांनी विशेष परिश्रम घेतले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून आवश्यक कौशल्ये आत्मसात केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रा. राम गोसावी व प्रा. देवेंद्र कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमात कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रमाणपत्र स्वीकारताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. सी. डी. धिंदळे यांनी केले.

त्यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट व विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा गौरव केला. प्रा. राम गोसावी यांनी उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक, विद्यार्थी व आयोजकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. समारंभाने विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला चालना मिळाली असून भविष्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## संपादकीय

# मानसिक संकटाची चाहूल

सगळ्यांना सामावून घेणाऱ्या, यशस्वी आयुष्याची संधी देणाऱ्या, जगण्याला आधार देणाऱ्या मुंबई महानगरीत मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने सारे काही आलबेल नाही याचा इशारा अलीकडच्या दोन-तीन घटनांनी दिला आहे. किरकोळ वाद थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत पोहोचत असतील तर कायदा-सुव्यवस्थेइतकाच त्याचा सामाजिक आणि मानसिक आरोग्याशी निगडित प्रश्न म्हणून विचार होण्याची गरज आहे.

**धावणारे शहर, सहनशील शहर आणि कुठल्याही संकटातून सावरून पुन्हा उठून उभे राहात पुढे चालत राहणारे शहर अशीच कायम मुंबई शहराची ओळख राहिली आहे. मात्र गेल्या काही दिवसांत या शहरांत घडलेल्या काही घटना येथील लोकांच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल धोक्याचा इशारा देणाऱ्या म्हणाव्या लागतील. रोज रात्री गगनचुंबी इमारतींमधील चमचमत्या दिव्यांनी उजळून निघणाऱ्या या महानगरीतील काही सामान्यांच्या मनांतील अंधारात इतकी पराकोटीची अस्वस्थता कोंडलेली आहे की छोटेसे निमित्त मिळाले तरी तिचा आत्यंतिक हिंस्त्र असा आविष्कार होतो आहे. २२ जूनला मुंबईच्या पश्चिम उपनगरीय लोकलमध्ये किरकोळ वादातून एकाने एका तरुणाची चाकूने हत्या केली, तर दुसऱ्या घटनेतही माहिम येथे क्षणिक संतापातून एकाने अन्य इसमाला पाठलाग करून चाकूने वार केले. तिसऱ्या घटनेत एका मानसिक संतुलन ढळलेल्या इसमाने मोहर्रमच्या मिरवणुकीत विषारी गोळ्या वाटून अनेकांच्या जिवाला धोका पोहोचवण्याचा प्रयत्न केला. या इसमाचे कुणा दहशतवादी संघटनांशी संबंध होते का याचा तपासही सुरू आहे, पण दोन वर्षांपूर्वी पत्नी वेगळी झाल्यापासून त्याला नैराश्याने ग्रासले आहे असे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. या तिन्ही घटनांकडे गुन्हेगारीच्या दृष्टिकोनातून पाहण्यासोबतच समाजातील वाढत्या अस्वस्थ आणि आक्रमक मानसिकतेचा गंभीर इशारा म्हणूनही पाहण्याची गरज आहे. हिंसेचे कोणत्याही कारणामुळे समर्थन होऊ शकत नाही. पण आजच्या शहरी जीवनात ताण, स्पर्धा, वाहतुकीची कोंडी, गर्दी, आर्थिक दबाव आणि सततची असुरक्षितता यांचा माणसाच्या मनावर परिणाम होतो आहे एवढे मात्र निश्चित. आणि या परिणामातून किरकोळ वाद थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत पोहोचत असतील तर त्याचा सामाजिक आणि मानसिक आरोग्याशी निगडित प्रश्न म्हणून विचार होण्याची गरज आहे. मुंबई लोकलमधील हल्ल्याने तर विशेष चिंता निर्माण केली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार निव्वळ पावसामुळे रेल्वेच्या डब्याचे दार बंद करण्यावरून त्यांच्यात वाद सुरू झाला आणि त्याचे रूप क्षणात भीषण हिंसेत बदलले. अशा घटनांनंतर आरोपींना कठोर शिक्षा व्हावी एवढीच अपेक्षा पुरेशी नाही. समाजात काय कुठे चुकते आहे याचाही विचार करावाच लागेल. सोशल मीडियावरील सततचा आक्रमक संवाद, राग व्यक्त करण्याची वाढती प्रवृत्ती, सहनशीलतेचा अभाव आणि 'मीच बरोबर' ही मानसिकता सध्या मोठ्या प्रमाणावर दिसून येते आहे. संवादाऐवजी संघर्ष हा पर्याय निवडला जातो आहे. अशा हिंसक घटनांना आळा घालण्यासाठी कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्याची गरज आहेच. रेल्वे स्थानके आणि गर्दीच्या ठिकाणी गस्त वाढवणे, संशयास्पद वस्तू व शस्त्रांवर कठोर नियंत्रण, सीसीटीव्ही यंत्रणेचा अधिक प्रभावी वापर आणि जलद तपास यामुळे अशा घटनांना काही प्रमाणात आळा बसू शकतो. यासोबतच कुटुंब, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भावनांवर नियंत्रण, मतभेद हाताळण्याची पद्धत आणि संवादाचे महत्त्व यावर भर देण्याची वेळ आली आहे. राग स्वाभाविक आहे. पण तो हिंसेत बदलणे हे सुसंस्कृत समाजाचे लक्षण नाही.**

# नवी मुंबई : नियोजनातून उभे राहिलेले आधुनिक शहर





मुंबईवरील वाढता लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी १९७०च्या दशकात ज्या शहराची संकल्पना मांडली गेली, ते नवी मुंबई आज महाराष्ट्रातील सर्वात नियोजित आणि वेगाने विकसित होणारे शहर म्हणून ओळखले जाते. ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले हे शहर केवळ निवासी संकुलांपुरते मर्यादित न राहता, शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि पर्यटन अशा सर्वच क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे. नवी मुंबईची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्याचे नियोजन. सिडकोने विकसित केलेल्या या शहरात प्रत्येक नोडला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आहे.

वाशी, नेरूळ, बेलापूर, खारघर, कामोठे, पनवेल अशा प्रत्येक भागात निवासी, व्यापारी आणि औद्योगिक विभागांची सुयोग्य विभागणी करण्यात आली आहे. रुंद रस्ते, भरपूर मोकळी मैदाने, उद्याने आणि खेळाची मैदाने यामुळे येथील जीवनमान उंचावले आहे. सेक्टर पद्धतीमुळे पत्ते शोधणे सोपे होते आणि वाहतुकीचे नियोजनही सुलभ होते. नवी मुंबईला मुंबईशी जोडणारी हार्बर रेल्वे लाईन ही येथील जीवनवाहिनी आहे. वाशी ते पनवेल आणि ठाणे ते पनवेल या मार्गांमुळे दररोज लाखो प्रवासी सहज प्रवास करतात. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि सायन-पनवेल महामार्ग यामुळे रस्ते वाहतूकही गतिमान झाली आहे. नवी मुंबई मेट्रोचा पहिला टप्पा बेलापूर ते पेंधर सुरू झाल्याने अंतर्गत वाहतुकीला मोठी चालना मिळाली आहे. आगामी काळात खारघर-तळोजा-मिडीसी आणि विमानतळाला जोडणारे मार्ग सुरू झाल्यावर शहराच्या दळणवळण व्यवस्थेत आणखी भर पडणार आहे.

नवी मुंबईच्या विकासाला खरी कलाटणी मिळाली ती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीमुळे. उलवे परिसरात आकाराला येणारे हे विमानतळ २०२५ पासून टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होत आहे. या विमानतळामुळे केवळ रायगड आणि नवी मुंबईच नव्हे तर संपूर्ण कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळण सोपे होणार आहे. विमानतळ परिसरात एमआरओ हब, कार्गो कॉम्प्लेक्स, व्यावसायिक संकुले उभी राहत असल्याने हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

विमानतळाला जोडण्यासाठी उलवे कोस्टल रोड, एअरपोर्ट मेट्रो आणि जलवाहतुकीचे प्रकल्पही प्रस्तावित आहेत.नवी मुंबई आज शिक्षणाचे प्रमुख केंद्र बनले आहे. डी.वाय. पाटील विद्यापीठ, आयटीएम, भारती विद्यापीठ, रायगड मेडिकल कॉलेज यांसारख्या मोठ्या शैक्षणिक संस्था येथे आहेत. सीबीएसई, आयसीएसई आणि स्टेट बोर्डाच्या दर्जेदार शाळांमुळे पालकांचा ओढा नवी मुंबईकडे वाढला आहे. आरोग्य सुविधांमध्येही नवी मुंबई आघाडीवर आहे. अपोलो, फोर्टिस, एमजीएम, डी.वाय. पाटील रुग्णालयांसह अनेक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल्समुळे नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवा मिळत आहेत. वाशीतील महापालिकेचे रुग्णालय आणि नेरूळमधील कॅन्सर हॉस्पिटल ही देखील महत्त्वाची केंद्रे आहेत. महापे येथील एमआयडीसी, तळोजा औद्योगिक क्षेत्र आणि बेलापूर सीबीडी यामुळे नवी मुंबई हे व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर ठरले आहे.

माहिती तंत्रज्ञान कंपन्यांची वाढती संख्या आणि स्टार्टअप्ससाठी पोषक वातावरण यामुळे तरुणांना नोकरीसाठी मुंबईत जाण्याची गरज उरलेली नाही. द्रोणागिरी नोडमध्ये विकसित होणारा जेएनपीटी-सेझ आणि लॉजिस्टिक पार्क यामुळे आयात-निर्यात व्यवसायाला चालना मिळाली आहे. विकासोबतच नवी मुंबईने निसर्गही जपला आहे. खारघरमधील सेंट्रल पार्क, पांडवकडा धबधबा, बेलापूरचा ज्वेल ऑफ नवी मुंबई, वंडर पार्क, वाशीतील मिनी सी-शोर ही ठिकाणे नागरिकांची सुट्टीची आवडती ठिकाणे बनली आहेत. पाम बीच मार्गावरील मॅन्ग्रोव्ह उद्यान आणि फ्लेमिंगो दर्शन केंद्र हे पर्यावरण पर्यटनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हिवाळ्यात येथे येणारे रोहित पक्षी पर्यटकांना मोठी पर्वणी ठरतात. उरणमधील बीचेस आणि करंजा-रेवस जेट्टी परिसर वीकेंड डेस्टिनेशन म्हणून विकसित होत आहेत.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह, नेरूळमधील आगरी-कोळी संस्कृती केंद्र आणि विविध ठिकाणी भरणारी कला प्रदर्शने यामुळे शहराचे सांस्कृतिक वातावरण जिवंत राहिले आहे. डी.वाय. पाटील स्टेडियम हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट आणि फुटबॉलचे मैदान नवी मुंबईची शान वाढवते. आयपीएल, आयएसएल आणि अनेक राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन येथे होत असल्याने क्रीडाप्रेमींसाठी ही मोठी मेजवानी असते. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी यांसारखे सण येथे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.नवी मुंबई आता पुढच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. विमानतळ प्रभाव क्षेत्रात 'नैना' प्रकल्पांतर्गत नवीन स्मार्ट शहरे विकसित होत आहेत. पनवेल-करंजा रोड, ट्रान्स हार्बर लिंक, विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर यांसारखे पायाभूत प्रकल्प पूर्ण झाल्यावर नवी मुंबईचे महत्त्व आणखी वाढणार आहे.

सायकल ट्रॅक, इलेक्ट्रिक बस, घनकचरा व्यवस्थापन यांसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे नवी मुंबई 'ग्रीन सिटी' म्हणूनही नावारूपाला येत आहे. नियोजन, आधुनिकता आणि निसर्ग यांचा सुंदर संगम असलेले नवी मुंबई शहर येणाऱ्या पिढ्यांसाठी एक आदर्श मॉडेल ठरत आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि दर्जेदार जीवनशैली या सर्वच बाबतीत परिपूर्ण असलेले हे शहर 'स्वप्ननगरी मुंबई'ला खऱ्या अर्थाने पूरक ठरत आहे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# पासवर्ड लीक झाल्यास गुगलचे 'हे' टूल सांगेल, जाणून घ्या...

तुम्ही काही दिवसांपूर्वी वाचले असेल की १६ अब्ज पासवर्ड लीक झाले. या बातमीने तुमच्या कपाळावर चिंतेच्या रेषा



रेखाटल्या असतील. पण, चिंता करणे थांबवा आणि सतर्क राहा. आज आम्ही तुम्हाला गुगलच्या एका टूलबद्दल सांगणार आहोत, ज्याबद्दल अनेकांना माहिती असेल, पण अजूनही बरेच युजर्स असे आहेत ज्यांना या टूलबद्दल माहितही नाही.

गुगलच्या या टूल किंवा फीचरचं नाव आहे गुगल पासवर्ड चेकअप. ज्याप्रमाणे डॉक्टर आजार पकडण्यासाठी चेकअप करतात, त्याचप्रमाणे गुगलचे टूल तुमचा पासवर्ड लीक झाला आहे की नाही हे तपासत राहते. जर कधी पासवर्ड लीक झाला तर गुगलचे हे टूल ताबडतोब अलर्ट करते. चला तर मग पुढे विस्ताराने माहिती जाणून घेऊया.

या फिचरबद्दल एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे गुगल पासवर्ड मॅनेजरसोबत तुम्ही तुमचा पासवर्ड सुरक्षित ठेवला असेल तरच गुगलचे टूल तुम्हाला अलर्ट करेल. सोप्या भाषेत समजले तर गुगल पासवर्ड मॅनेजरमध्ये आवश्यक पासवर्ड सेव्ह केला असेल तर डेटा ब्रीच (पासवर्ड लीक) वर तुम्हाला इन्स्टंट अलर्ट मिळेल. लॅपटॉप किंवा सिस्टीमद्वारे गुगल क्रोम ओपन करा, त्यानंतर उजव्या बाजूला दिसणाऱ्या तीन ठिपक्यांवर टॅप करा आणि पासवर्ड आणि ऑटोफिल पर्यायावर जा. या ऑप्शनवर टॅप करताच तुम्हाला गुगल पासवर्ड मॅनेजरचा पर्याय दिसेल.

या ऑप्शनवर क्लिक केल्यानंतर डाव्या बाजूला पासवर्ड, चेकअप आणि सेटिंग्सचा पर्याय दिसेल. पासवर्ड सेव्ह करण्यासाठी तुम्ही पासवर्ड पर्यायावर क्लिक करू शकता, अॅडवर टॅप करू शकता, जर तुम्ही आधीच पासवर्ड सेव्ह केला असेल तर चेकअपवर क्लिक करा. चेकअपवर टॅप केल्यानंतर तुमचा पासवर्ड लीक झालेला नाही हे तुम्हाला कॉम्प्रोमाइज्ड पासवर्डमध्ये दिसेल. याशिवाय गुगलचे हे टूल तुम्हाला कोणत्या अॅपसाठी कमकुवत पासवर्ड तयार केला आहे, याची ही माहिती देईल. याशिवाय गुगलच्या या फीचरमुळे तुम्ही कोणत्या अकाऊंट्सवर एकच पासवर्ड वापरला आहे, याचीही माहिती मिळेल.

तुम्ही आधीच पासवर्ड सेव्ह केला असेल तर तुम्ही फोनच्या सेटिंग्जमधील गुगल पर्यायावर जाऊन गुगलसोबत ऑटोफिलमधील पासवर्ड मॅनेजरकडे जाऊन पासवर्ड चोरीला गेला आहे की नाही किंवा कोणत्या अॅपसाठी तुम्ही कमकुवत पासवर्ड सेट केला आहे हे तपासू शकता.

# भावकवी कृष्ण बळवंत निकुंब



## निमित्त

आपल्या कवितेतून प्रेमाविषयी अत्यंत हृदयंगम, आर्त भावना व्यक्त करणारे कवी कृ. ब. निकुंब एक भावकवी आणि 'मृगावर्त' या नाविन्यपूर्ण खंडकाव्याचे निर्माते म्हणून कविवर्य कृ. ब. निकुंब मराठी साहित्यसृष्टीला परिचित आहेत. नऊ ऑगस्ट १९२० रोजी जन्मलेले कृष्ण निकुंब हे न. चिं. केळकर सुवर्णपदक मिळवून एमए झालेले बुद्धिमान कवी. बेळगावमधल्या लिंगराज महाविद्यालयात ते मराठी विभागप्रमुख आणि मराठीचे प्राध्यापक होते. कृ. ब. निकुंब कॉलेजमध्ये 'साहित्यातील परंपरा आणि संप्रदाय' हा विषय समरसून शिकवायचे. शिकविण्याच्या ओघात कितीतरी कवींच्या कविता सहज म्हणायचे. प्रत्येक वर्गाला काहीतरी नवीन देण्याचा निकुंब प्रयत्न करायचे. त्यांच्या व्याख्यानातून विद्वतेचा फार मोठा ओघ विद्यार्थ्यांच्या काळजापर्यंत पोहोचायचा. कितीतरी कविता, ज्ञानेश्वरी सरांना पाठ होती. गर्व, अहंकार यापासून लांब राहून विद्यार्थ्यांत मिसळून निकुंब समजावून द्यायचे.

मराठी साहित्य परिषदेचं काम करत असताना त्यांनी साहित्य-पत्रिकेचं संपादनही केलं होतं. त्यांनी गझल आणि सुनीत हे प्रकार वापरून काव्यरचना केल्या होत्या. गूढता, आर्तता आणि कोमलता हे त्यांच्या काव्याचे विशेष होते. त्यांच्या काव्यात प्रेमाविषयी अत्यंत सूचक आणि हृदयंगम रचना आढळतात.

कृ.ब.निकुंब यांची 'घाल घाल पिंगा वाऱ्या' ही कविता तिच्या वेगळेपणामुळे आणि रसाळ काव्यआशया मुळे उठून दिसते. थेट काळजाला हात घालणारे शब्द अन भावविभोर झालेल्या सासूरवाशिणीचे हृदयंगम प्रकटन जणू आपण अनुभवत आहोत असा भास या कवितेतून होतो.

या कवितेला कमलाकर भागवत यांनी अत्यंत करुण चाल लावली अन त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली सुमन कल्याणपूर यांनी आर्त स्वरात हे गाणं असं काही गायलं की पुर्वी रेडीओवर हे गाणं लागलं की सर्व वयाच्या सासूरवाशिणी हमसून हमसून रडत असत !! आजही या गाण्याची अवीट गोडी टिकून आहे.

ऋपारख' हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू. निर्मळ, आस्वादक दृष्टी, निर्णयातील सूक्ष्मता आणि निश्चितता, शैलीचे ललित्य आणि संयम या विशेषांचा समन्वय तर ह्या समीक्षालेखांत झालाच आहे, पण महत्त्वाची गोष्ट अशी की, ऋकेकावली'त संज्ञाप्रवाहाचे दर्शन घडते किंवा बालकवींच्या कवितेत जोडाक्षराचे दाठरपण मोडून त्याला सुकुमार रूप प्राप्त होते, यांसारखी लहानमोठी अपरिचित सौंदर्यस्थळे निकुंबाना अचूक गवसली होती. कवी निकुंब यांच्या कविता मोजक्याच मात्र आशयघन आहेत.

ऊर्मिला, उज्ज्वला, अनुबंध, अभ्र, पत्रंपुष्पम, फणसाचं पान, साहित्य-पराग, साहित्य समीक्षा, पारख, पारसाच घर, सायसाखर, मृगावर्त अशी त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. मराठी साहित्य परिषदेचं काम करत असताना त्यांनी साहित्य-पत्रिकेचं संपादनही केलं होतं. त्यांनी गझल आणि सुनीत हे प्रकार वापरून काव्यरचना केल्या होत्या. गूढता, आर्तता आणि कोमलता हे त्यांच्या काव्याचे विशेष होते. कवी निकुंब यांचे ३० जून १९९९ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कच्च्या पपईचे सेवन करून आजार ठेवा दूर

जर तुम्ही तुमच्या आहारात कच्च्या पपईचा समावेश केला तर ते आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. आजच्या या लेखात आम्ही तुम्हाला कच्ची पपई खाण्याचे फायदे सांगणार आहोत. यासोबतच तुमच्या आहारात कच्ची पपई कशी समाविष्ट करू शकता हेदेखील सांगणार आहोत चला सविस्तरपणे जाणून घेऊयात...



कच्ची पपईच्या सेवनाने पचन सुधारते. गॅस, पोट फुगणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या पोटाच्या समस्यांपासून आराम देण्यासाठी खूप प्रभावी आहे. कच्च्या पपईमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी भरपूर असते, ज्यामुळे त्वचा चमकदार होते. तसेच त्वचेवरील सुरकुत्यादेखील कमी होतात.

कच्च्या पपईच्या सेवनाने शरीरातील जळजळ कमी होते. संधिवातासारख्या समस्यांपासून आराम मिळण्यासही उपयुक्त ठरते. तुम्ही योग्य प्रमाणात कच्च्या पपईचे सेवन केले तर तुमचे पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे तुम्ही जास्त खाण्यापासून वाचता आणि वजन कमी करणे तुमच्यासाठी सोपे आहे.

हाडे मजबूत करण्यासाठीदेखील कच्ची पपईचे सेवन फायदेशीर ठरते. जर तुम्ही तुमच्या आहारात कच्च्या पपईचा समावेश केला तर तुमचे केस मजबूत होतात. तसेच, तुमचे केस जलद वाढतात.

कच्ची पपई रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते. मधुमेही रुग्णांनी कच्ची पपई त्यांच्या आहाराचा भाग बनवावे.

या पपईच्या सेवनाने आपले पचन सुधारते. तसेच यामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी आढळते जे आपल्या शरीरासाठी फायदेशीर ठरते. याशिवाय कच्चा पपईत पपेन नावाचे एंजाइम असते जे पचनक्रियेला मदत करते तसेच शरीरातील जळजळ कमी करते.

**आहारात अशी समाविष्ट करावी?**

* तुम्ही कच्ची पपई सॅलडमध्ये मिक्स करून खाऊ शकता.
* कच्च्या पपईपासून बनवलेला पराठाही चविष्ट लागतो.
* तुम्ही कच्ची पपईची भाजीही बनवू शकता.
* कच्च्या पपईचा रसही आरोग्यासाठी फायदेशीर आहे.
* तुम्ही कच्च्या पपईचे लोणचेदेखील बनवू शकता.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# रायगड जिल्ह्यात पोलिओ लसीकरण मोहिमेस प्रतिसाद

## एक लाख ५९ हजार ८३२ बालकांना देण्यात आली प्रतिबंधक लस

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवार (दि . २८) रोजी रायगड जिल्ह्यात लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण एक लाख ५९ हजार ८३२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली आहे.

जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत. त्याचप्रमाणे स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरण करण्यात येणार आहे.

आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार पालकांनीही लसीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना तर जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत १५ हजार ९०८ बालकांना पोलिओ लस देण्यात आली.



पालकांना प्रोत्साहन देण्यासाठी यानिमित्त रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे हस्ते अंगणवाडीमध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा पवार व वैद्यकीय अधिकारी डॉ. उन्नती चव्हाण उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे रायगड जिल्हा प्ररिषदेचे उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांनी रोहा उपजिल्हा रुग्णालयाला भेट देत लसीकरणाचा शुभारंभ केला. यासोबतच जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली व पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा आढावा घेतला. रायगड जिल्हा परिषदेचे अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या हस्ते जनसेवा शाळा पोलादपूर येथे लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रसिका केणी यांनी प्रा.आ.केंद्र पोयनाड येथे पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमास भेट दिली. जिल्हा समाजकल्याण समितीचे



सभापती नारायण डामसे यांनी कळंब प्राथमिक आरोग्य केंद्र येथे लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांनी माथेरान येथे लसीकरण बुथ, बी.जे.रूग्णालय व एचबीटी दवाखाना येथे भेट दिली.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पोलिओ बूथचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे, जिल्हा कुष्ठरोग आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिलकुमार शाह, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहय्यिका, आरोग्य सेविका, आशा सेविका उपस्थित होते. आ. केंद्र वावोशी येथे रायगड जिल्हा परिषद सदस्य रेश्मा पाटील, पंचायत समिती खालापूर उपसभापती भाई शिंदे, सरपंच गोरठण बु. ग्रामपंचायत सागर हाडप यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. प्रा. आ. केंद्र मोहिली येथे पंचायत समिती सभापती कर्जत नमिता सुधाकर घारे यांच्या हस्ते, पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रिती करवंदे, डॉ उत्कर्षा मनवर, आरोग्य सहाय्यक सूर्यकांत धायगुडे, आरोग्य सहाय्यिका मीना नाडेकर व इतर कर्मचारी उपस्थित होते. मोहिमेसाठी सर्व वैद्याकीय अधिकारी, नोडल अधिकारी, पर्यवेक्षक, आशासेविका, अंगणवाडीसेविका, आरोग्यसेवक, आरोग्यसेविका यांनी मेहनत घेतली.

मोहिमेच्या पहिल्या दिवशी बूथवर लसीकरण केल्यानंतर पुढील टप्प्यात आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरण देण्यात येणार आहे.

# खालापुरात होमगार्डला मारहाण; दोघांवर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी नियंत्रित करणारा होमगार्ड दीपेश हातनोलकर वय २७ रा. वावोशी खालापूर.याला कार मधील राज मोरे आणि त्याचा साथीदार प्रदीप राजाराम मोरे दोघे राहणार देवाची आळंदी खेड यांनी शिवी देऊन मारहाण केली. सदर घटना रविवारी संध्याकाळी पावणे सहाच्या सुमारास घडली.

दीपेश हा जुन्या मुंबई पुणे महामार्गावर चौक फाटा येथे वाहतूक नियंत्रण करण्यासाठी कर्तव्य बजावत होता. दरम्यान दीपेश याने कार थांबवल्याचा राग मनात धरून राज आणि प्रदीप यांनी दीपकच्या अंगावर धावत जात शिवीगाळ केली .दीपेशच्या सरकारी गणवेशाची कॉलर पकडून त्याला धक्काबुक्की केली. शासकीय कामात प्रतिबंध केल्याप्रकरणी राज आणि प्रदीप यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे करीत आहे.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २६५ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून २,६९,००० रुपये दंड आकारला आहे.

# द.ग. तटकरे महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती २७ जून रोजी अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि समाजप्रबोधनाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक न्याय, समता, शिक्षण आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांना अभिवादन करत विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा समजावून सांगण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय यांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. राजेंद्र आचार्य यांनी सांगितले की, "छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे केवळ कोल्हापूर संस्थानाचे दूरदृष्टीचे राजे नव्हते, तर ते खऱ्या अर्थाने समाजसुधारक, प्रजाहितदक्ष आणि शिक्षणप्रेमी शासक होते. शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती. सर्वसामान्य, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांनी पालकांवरही जबाबदारी निश्चित केली. तसेच रेल्वे सुविधा, सामाजिक सुधारणा आणि लोककल्याणकारी योजनांद्वारे त्यांनी प्रजेच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली.

कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र आचार्य व प्रा. नेहा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. जन्म/रजि/एसआर /२०२६

१) श्री. हसन अब्दुल रेहमान जळगावकर
रा. हाळ बुद्रुक, ता. खालापुर, जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म–मृत्यु नोदणी अधिकारी,
मुख्याधिकारी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री.हसन अब्दुल रेहमान जळगावकर, रा. हाळ बुद्रुक, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांचा जन्म दिनांक २९/०१/१९७४ रोजी मौजे हाळ बुद्रुक, ता. खालापूर, जि. रायगड येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास **त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत** या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्कयानिशी दिली असे.

**ठिकाण :– खालापूर**
**दिनांकः– २९/०६/२०२६**

शिक्का

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

## महाराष्ट्र शासन
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email:–mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(०२१४५) २२२१६७

### निविदा सूचना क्रमांक ०६ सन २०२६ २०२७

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन – ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५– २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी – १ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे कडापे येथील कडापे तलावाचे संवर्धन करणे. ता. माणगाव जि रायगड | ८०८७१४८ | ८१०००/– | ११८०/– | ६ महिने | वर्ग चार अ |
| २ | मौजे कोस्ते येथील कोस्ते तलावाचे संवर्धन करणे. ता. माणगाव जि रायगड | ६६९३७५१ | ६७०००/– | ११८०/– | ६ महिने | वर्ग चार अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२९/०६/२०२६** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०६/०७/२०२६ वेळ १८.०० वाजे पर्यत |
| २ | ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **०८/०७/२०२६** वेळ १०.०० वाजता |

टिपः– परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पहाता येतील.

क्रमांक : आरओसी/2026–27/क्र.–5/सी १३६७
दिनांक : २५.०६.२०२६

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
महाड (सा.बां.) विभाग, महाड करीता

## महाराष्ट्र शासन
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email:–mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(०२१४५) २२२१६७

### निविदा सूचना क्रमांक ०५ सन २०२६ २०२७

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ – २२२१६७ हे महाराष्ट्र शासना कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को–या निविदा नमुना **दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०३/०७/२०२६रोजी १८.०० वाजे** पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक **०६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक ०६/०७/२०२६** रोजी **११.००** वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळा येथील आय.टी.आय इमारतीच्या वर्ग खोली क्र. १ ची किरकोळ दुरुस्ती (संरचनात्माक मजबुतीकरण) करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | ८३४६२० | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | शासकीय औद्योगिक प्राशिक्षण संस्था श्रीवर्धन इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (सॅनिटरी फिटिंग, प्लंबीग, लादिकाम इ.) | ८३५९४५ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | शासकीय औद्योगिक प्राशिक्षण संस्था श्रीवर्धन इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणे (आतून गिलावा दुरूस्ती, रंगरंगोटी) तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ८३९६९३ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | शासकीय औद्योगिक प्राशिक्षण संस्था श्रीवर्धन इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणे (छत, दरवाजा, खिडकी इ.) तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ८३८२०६ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | झोळांबे आदिवासीवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याचे साकव बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड | ८०२०४० | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | शासकीय धान्य गोदाम श्रीवर्धन इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (सॅनिटरी फिटिंग, प्लंबींग, शटर इ.) | ८१२१५९ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | माणगांव येथील मा. जिल्हा न्यायाधीश निवासस्थानाची किरकोळ दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (स्लॅब, लादीकाम) | ५०४२५७ | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | माणगांव पोलीस स्टेशन च्या मुख्य इमारतीचे विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड (प्लास्टर, रंगकाम, पाणी पूरवठा आणि सॅनिटरी, रफू) | ५४९४६८ | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | रायगड जिल्हा पोलीस दलाअंतर्गत पोलादपूर पोलीस ठाणे येथे महिला पोलीस अधिकारी किंवा अमलदार करिता प्रसाधनगृह व विश्रांतीगृह बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ५१२३९३ | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | बारसगाव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि मी १०/९०० पाईप मोरीचे बांधकाम करणे. | ६५४९९३ | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | बारसगाव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि मी ११/३०० पाईप मोरीचे बांधकाम करणे. | ६८६१६४ | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १२ | बारसगाव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि मी ११/४५० पाईप मोरीचे बांधकाम करणे. | ६६०२६० | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |

टिप :– १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२१३४
दिनांक : २५.०६.२०२६.
विमाका/ कोवि/२०२६–२०२७/५१

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
महाड (सा. बां.) विभाग, महाड करिता

## अपर तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात

प्रशासकीय भवन, दुसरा मजला, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चौक, फडके नाट्यगृहाच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड. पिन ४१० २०६

पत्र क्र. मशा/जमीनबाब/कात–१/कलम १४३ नुसार दावा/२०२६

१. गोमा हसुराम पाटील
व इतर } **अर्जदार**

**विरुद्ध**

१. हिराजी शंकर शिवकर
२. रामदास शंकर शिवकर
३. विठाबाई महादेव पाटील
४. पार्वती कृष्णा ठाकुर
५. शंकर धाया पाटील
६. पार्वती तुकाराम पाटील
७. लता तुकाराम पाटील
८. भरत तुकाराम पाटील
९. मधुकर तुकाराम पाटील
१०. रूपेश तुकाराम पाटील
११. रमेश तुकाराम पाटील
१२. केशव तुकाराम पाटील
१३. अनुसया शेखर कोळी
१४. नंदा मुकेश वाघीलकर
१५. भरत चांगु ठाकुर
१६. अर्जुन जानु घरत
१७. सदानंद जानु घरत
१८. पोशाबाई हरिभाऊ पगडे
१९. पांडुरंग जाना कोळी
२०. रामुबाई अर्जुन पाटील
२१. राजुबाई जगन्नाथ कोळी
२२. महादुबाई नारायण पाटील
२३. तुळशिबाई धाऊ पाटील
२४. लक्ष्मीबाई धाऊ पाटील
२५. रोहिणी धाऊ पाटील
२६. सावित्री आत्माराम पाटील
२७.जगन्नाथ कमलाकर पाटील
२८. जयराम कमलाकर पाटील
२९. मालुबाई नारायण पाटील
३०. लिलाबाई भरत पाटील
३१. सुरेखा दिलीप थळकर
३२.दत्ता पांडुरंग पाटील
३३. पोशीबाई पांडुरंग पाटील
३४. बारक्या पांडुरंग पाटील
३५. जितेंद्र महादेव पाटील
३६. कविता कल्पेश पाटील
३७. शशिकांत शंकर पाटील
३८. सिताराम पांडुरंग पाटील
३९.लक्ष्मण पांडुरंग पाटील
४०. मारुती पांडुरंग पाटील
४१. लिलाबाई कृष्णा पाटील
४२. विनोद महादेव पाटील
४३. कल्पेश कृष्णा पाटील
४४. मालती महादेव पाटील
४५. शामकांत शंकर पाटील
४६. सारीका गजानन पाटील
४७. आनंदीबाई तुकाराम पाटील
४८. धर्मेंद्र महादेव पाटील
४९. पार्वतीबाई शंकर पाटील
५०. तृप्ती अरविंद कोळी
५१. कैलास लक्ष्मण कोळी
५२. संगिता निवृत्ती कोळी
५३. दिपाली शशिकांत कोळी
५४. बेबीबाई लक्ष्मण काळी
५७ गिता नंदकुमार कोळी
५६. रणजित लक्ष्मण कोळी
५७. ज्योती लक्ष्मण कोळीत
५८. विजया अनंता पाटील
५९. मोनिका अनिकेत ठाकुर
६०. अर्पणा भुषण म्हात्रे
६१. अनिता अनंता पाटील
रा. केळवणे, ता. पनवेल, जि.रायगड– ४१०२०६ } **सामनेवाला**

**मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये चौकशी दावा जमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे केळवणे, ता. पनवेल | ४/२ | ०.१८.०० | २.४४ |
| | ४/४ | ०.२८.८० | ४.२५ |
| | ४/३ | ०.२७.३० | ४.०० |

ज्याअर्थी, अर्जदार श्री.गोमा हासुराम पाटील व इतर यांनी त्याच्या मालकीची उक्त नमूद मिळकतीवर जाणेयेणेकामी सामनेवाला यांनी वहिवाटीचा रस्तामध्ये अडथळा निर्माण केला असल्याने सदरचा रस्ता मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून देणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे. त्या अनुषंगाने उक्त दावाच्याकामी निम्नस्वाक्षरीतांच्यासमोर दिनांक ०८/०७/२०२६ सकाळी ११.०० वा. अपर तहसीलदार कार्यालय पनवेल येथे सुनावणी निश्चित केलेली आहे.

त्याअनुषंगाने तुम्ही अगर तुमचे प्रतिनिधी मार्फत सर्वसाक्षी पुरावे व कागदपत्रांसह वरील ठिकाणी व वेळी अपर तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात हजर राहावे. त्याप्रमाणे तुम्ही अगर तुमचे अधिकृत प्रतिनिधी सुनावणीस हजर न राहिल्यास तुमचे काहीही म्हणणे नाही असे समजून प्रकरणाची सुनावणी तुमचे गैरहजेरीत होऊन गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ठिकाण –पनवेल
दिनांक : २५/०६/२०२६

**सही/–**
**(संभाजी शेलार)**
निवासी नायब तहसीलदार
अपर तहसीलदार कार्यालय पनवेल

# नवी मुंबईत कचरावेचक महिलांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीमध्ये नवी मुंबई शहराचे मानांकन असून या नावलौकिकात आपल्या स्वच्छताकर्मींचा सर्वात महत्त्वाचा वाटा असून त्यामध्ये कचरावेचक महिलांचेही मोठे योगदान असल्याचे सांगत महापौर सुजाता पाटील यांनी संघर्षातून खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या महिलांचे कौतुक केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित भारत सरकारच्या 'नमस्ते (नॅशनल ॲक्शन फॉर मॅकनाईज्ड सॅनिटेशन इकोसिस्टिम)' योजनेंतर्गत नमुंमपा क्षेत्रातील अनौपचारिक कचरावेचक (इन्फॉर्मल वेस्ट पिकर्स) यांना पीपीई किट, आयुष्मान भारत कार्ड आणि नमस्ते ओळखपत्र वितरण समारंभप्रसंगी महापौर सुजाता पाटील बोलत होत्या. याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ. अजय गडदे, स्त्री मुक्ती संघटनेच्या प्रमुख प्रा. वृषाली मगदूम, मुख्य स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी नंदा घुले, आशामती शेंडगे, शशिकला कसबे, चंद्रकला जाधव, सावित्री सगणे, शोभा पालराज, लैलाबी शेख, लक्ष्मी कांबळे, दुर्गा गोहील, कौसाबाई चंदवाडे, शकुंतला घनघाव, स्वाती थडके, अनिता थोरात, मीरा जाधव, हनिफा शेख यांना प्रातिनिधिक स्वरूपात नमस्ते योजनेंतर्गत पीपीई किट व सामुग्री प्रदान करण्यात आली.

त्याचप्रमाणे यूएनडीपी योजनेंतर्गत प्राप्त दिघा, रबाळे, ऐरोली, घणसोली भागात चालणाऱ्या ई–रिक्षा कचरा संकलन वाहन चालक रुक्मिणी पॉल, कविता कुडवे, राधा गुप्ता, सुनिता सुरवाडे, निकिता सोमवंशी, प्रतिक्षा कुडवे, सुनिता वाकळे, सुवर्णा कलाम व आनंदी कांबळे यांचाही सन्मान करण्यात आला. स्त्री ही संघर्षातून अधिक ठामपणे उभी राहते हे कोरोना काळात प्रकर्षाने दिसून आले असून घर, संसार सांभाळून शहर स्वच्छतेसाठी दररोज आपले योगदान देणाऱ्या व त्यातही दहावीची परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या भगिनींचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, असे सांगत महापौरांनी शिक्षणासाठी वय नसते हे दाखवून देत तुम्ही इतरांना आदर्श वाटेल असे काम केले असल्याचे सांगितले. नवी मुंबई शहराला स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी झटणाऱ्या सुंदर हातांचा सन्मान करीत असल्याचा आनंद महापौरांनी व्यक्त केला.

## 'नमस्ते' योजनेतून पीपीई किट, ओळखपत्र वाटप



### ९३० महिलांची झाली नोंदणी

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी 'नमस्ते' योजनेंतर्गत अनौपचारिक कचरावेचकांची सुरक्षितता, आरोग्य व सन्मान याकडे विशेष लक्ष दिले जात असल्याचे सांगितले. यादृष्टीने कचरा वेचकांचे प्रोफाईलींग हे परिसर सखी विकास संस्थेच्या वतीने करण्यात येत असून आत्तापर्यंत ९३० महिलांची नोंदणी झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यापैकी नमस्ते योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या ४४८ पीपीई किट्सचे वितरण करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

त्यासोबतच ई–रिक्षा कचरा संकलन वाहन चालक महिला व दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कचरावेचक महिलांचा सन्मानही आज होत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्त्रीमुक्ती संघटनेच्या प्रमुख प्रा. वृषाली मगदूम यांनी कचरावेचक महिलांकरिता करण्यात येत असलेल्या कामात अगदी सुरुवातीपासूनच नवी मुंबई महानगरपालिकेचे सहकार्य लाभत असल्याचे सांगितले. पाच झोपडपट्ट्यांमध्ये राबविण्यात येणारे 'झिरो वेस्ट स्लम मॉडेल' हे देशभरातील आगळावेगळा उपक्रम म्हणून नावाजला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. नमस्ते योजनेमध्ये कचरावेचक महिलांचा समावेश करण्यासाठी सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्याविषयी माहिती देताना त्याला यश लाभल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. परिसर सखी विकास संस्थेच्या प्रमुख रुक्मिणी पॉल यांनी स्वअनुभव कथन करीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या पदाधिकारी, अधिकारी यांच्याकडून कचरावेचक महिलांना जो सन्मान मिळतो त्यामुळे खूप आनंद वाटतो असे सांगितले.

'आता थांबायचं नाय' या चित्रपटापासून प्रेरणा घेऊन स्त्री मुक्ती संघटना आणि प्रभात ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ११ कचरावेचक महिला यावर्षी दहावीची बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्या यशस्वी महिलांनाही महापौरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या आरंभीच्या सत्रात उपस्थित कचरावेचक महिलांनी चळवळीतील समूहगीते, प्रेरणादायी गीते व मनोगते सादर करून आपल्या अंगभूत कलागुणांचे दर्शन घडविले.

# पोलिओ मोहिमेच्या पहिल्याच दिवशी ८५ टक्के लसीकरण पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने रविवारी (दि. २८) राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या २६ नागरी आरोग्य केंद्रांमार्फत खासगी वैद्यकीय व्यावसायिकांचे दवाखाने, सोसायटी कार्यालये, रुग्णालये, रेल्वे स्टेशन, बस डेपो, बाजारपेठ, मॉल अशा विविध ठिकाणी ६१५ स्थायी, ७४ ट्रान्झिट व २७ फिरते मोबाईल असे एकूण ७१६ पोलिओ लसीकरण बूथ स्थापन करण्यात आले होते.

या प्रत्येक बुथवर पालकांनी आपल्या बालकांसमवेत येऊन बालकांना पोलिओचे डोस पाजले. नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी कुकशेत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी भेट देऊन काही बालकांना पोलिओ डोस पाजले. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे आणि इतर वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी' या घोषवाक्यास अनुसरून घरोघरी जाऊन नागरी आरोग्य केंद्रांमार्फत पोलिओ लसीकरण मोहिमेची जनजागृती करून पोलिओ लसीकरणाची माहिती पोहचविण्यात आली होती. लसीकरण



बूथवरील कर्मचारी, स्वयंसेवक यांच्यामार्फत बालकांना पोलिओ लस पाजण्यात आली.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या सुयोग्य नियोजनामुळे नमुंमपाचे ८५ टक्के इतके उल्लेखनीय काम झाले आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १०० टक्के लाभार्थींना पल्स पोलिओ लस मिळावी याकरिता २९ जून ते ३ जुलै या कालावधीत घरोघरी जाऊन पल्स पोलिओ डोस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ज्या बालकांना रविवारी बूथवर जाऊन डोस घेता आला नाही अशा बालकांसाठी विशेष मोहीम राबविली जात असून यासाठी घरांना भेट देणाऱ्या नमुंमपामार्फत येणाऱ्या स्वयंसेवकांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन महापौर सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# खांदा वसाहतीमधील अवजड वाहनांचे पार्किंग हटवावे

**नागरिकांची मागणी**

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील खांदा वसाहत सेक्टर ६ परिसरात पुन्हा एकदा रस्त्याच्या दुतर्फा अवजड वाहने पार्क करून ठेवली जात असल्याने वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या रस्त्यालगत शाळा असल्याने विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ट्रक, कंटेनर आणि इतर अवजड वाहने उभी राहत असल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. परिणामी शाळेत येणाऱ्या–जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. शाळा सुटण्याच्या आणि सुरू होण्याच्या वेळी वाहतूक कोंडीही वारंवार होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

या परिसरात कायमस्वरूपी उपाययोजना करून अवजड वाहनांचे पार्किंग तातडीने हटवावे, शाळेजवळ वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक व्यवस्था करावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक, पालक आणि शाळा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# खारघरमध्ये चालत्या रिक्षावर कोसळले झाड

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ७मधील जीएसटी इमारत आणि साई मंदिर नाल्यालगतच्या रस्त्यावर महाकाय झाड चालत्या रिक्षावर कोसळले. या अपघातात रिक्षाचे नुकसान झाले असून प्रवासी थोडक्यात बचावले आहेत.

रिक्षाचालक या घटनेत किरकोळ जखमी झाला आहे. झाडाच्या फांद्या आणि खोड रस्त्यावर पसरल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. तसेच झाड कोसळताना विद्युत खांबाला धडक लागल्याने काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

# बंद दुकानांतून रोख रक्कम चोरणारा जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात बंद दुकानाची कडी–कोयंडे उचकटून आतमध्ये असलेली रोख रक्कम चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरातून तो गुजरात येथे पळून जात असताना ताब्यात घेतले आहे. जगदीश फराड (४५, रा. चिंध्रण) असे या आरोपीचे नाव असून त्याने अनेक ठिकाणी केवळ रोख रक्कम चोरल्याची कबुली दिली आहे.

गेल्या काही दिवसांत पनवेल शहरातील लकी स्पोर्ट्स, सखी कलेक्शन, बिकानेर स्वीट्स, श्रीकृपा स्टेशनरी, बुक शॉप या ठिकाणी अज्ञात चोरट्याने चोरी करून दुकानातील फक्त रोख रक्कम चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. सदर चोरट्याला शोधण्याचे पनवेल शहर पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. याबाबत वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रेय देवकाते, पो. हवा. संदेश म्हात्रे, मिथुन भोसले, अमोल पाटील, पो. शि. साई मोकळ, काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे शोध घेत असताना सराईत गुन्हेगार जगदीश फराड याची माहिती मिळाली.

त्यानुसार पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचून सदर आरोपीला ताब्यात घेतले असता त्याने या चोऱ्यांची कबुली दिली असून त्याने यापूर्वी सुद्धा पनवेल शहर परिसरात अशाच प्रकारे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी हा फक्त रोख रक्कमच चोरत असे व त्यानंतर तो गुजरात येथे त्याच्या घरी जात असे व काही दिवसानंतर पुन्हा दुसऱ्या ठिकाणी अशाच प्रकारे चोरी करीत असल्याचे अधिक तपासात निष्पन्न झाले आहे. व्यावसायिक बंधूंनी आपल्या दुकानात, कार्यालयात चोरी झाली असल्यास सदर चोरी छोटी असली तरी याबाबतची माहिती व तक्रार नजीकच्या पोलीस ठाण्यात जरूर द्यावी, असे आवाहन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.






श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा स्तुत्य उपक्रम

# गव्हाण परिसरातील शाळांमध्ये मोफत वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मोलाचा हातभार लावण्यासाठी व सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने गेल्या ३० वर्षांपासून अविरतपणे शैक्षणिक उपक्रम राबवणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने यंदाही मदतीचा हात पुढे करण्यात आला. त्यानुसार श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पार्टी उलवे नोड २च्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २९) गव्हाण परिसरातील रायगड जिल्हा परिषदेच्या विविध शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे भव्य वाटप करण्यात आले.

हा स्तुत्य उपक्रम भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली व भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे व वाय. टी. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. परिसरातील शेलघर रायगड जिल्हा परिषद शाळा, गव्हाण रायगड जिल्हा परिषद शाळा व कन्या शाळा तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या बेलपाडा शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करून शैक्षणिक उत्साह द्विगुणित करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पनवेल पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, योगिता भगत, अनंता ठाकूर, विराज देशमुख, भाजपचे बेलपाडा अध्यक्ष संतोष म्हात्रे, गव्हाण पंचायत समिती उपाध्यक्ष गणेश पाटील, दत्तात्रय कोळी, अतिश पाटील, अरुण घरत, अशोक घरत, प्रकाश कडू, महेंद्र म्हात्रे, शैलेश भगत, प्रणय कडू, दीपक गोंधळी, मनोज नाईक, श्रीधर भगत, अमृत भगत, सुहास भगत, संतोष भगत, सुदर्शन घरत, योगेश भगत, अजय भगत, जीवन भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, महेश भगत, रामदास भगत, बानूबाई भगत, सीमा भगत, मयुरी भगत, अनिल कोळी यांच्यासह विविध शाळांचे शिक्षक, विद्यार्थी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवी मुंबईत भक्तिमय वातावरणात वटपौर्णिमा साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

वटपौर्णिमा सण सोमवारी (दि. २९) नवी मुंबईत भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच शहरातील विविध मंदिर परिसर आणि वडाच्या झाडांजवळ विवाहित महिलांची लगबग सुरू झाली होती. पारंपरिक नऊवारी साडी, हिरवा चुडा, नथ, गजरा आणि पारंपरिक दागिन्यांनी सजलेल्या महिलांच्या उपस्थितीमुळे परिसराला जणू सांस्कृतिक आणि आध्यात्मिक सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.



महिलांनी वटवृक्षाची पूजा करून भारतीय संस्कृतीतील कौटुंबिक मूल्ये, नात्यांतील विश्वास आणि परंपरेप्रती असलेली आपली निष्ठा पुन्हा एकदा अधोरेखित केली. परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख मेळ घालत साजरा झालेला वटपौर्णिमेचा उत्सव प्रत्येक कुटुंबाच्या सुख, समाधान, समृद्धी आणि अखंड सौभाग्यासाठी केलेल्या निःस्वार्थ प्रार्थनेचे जिवंत प्रतीक ठरला. महिलांच्या ओठांवरील प्रार्थना आणि डोळ्यांतील विश्वास हा भारतीय संस्कृतीतील नात्यांच्या पावित्र्याचा आणि प्रेमाच्या चिरंतन बंधाचा भावस्पर्शी आविष्कार ठरला.

# पनवेलमध्ये अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली असून त्याच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. सदर व्यक्तीचा मृतदेह सीसीआय लॉजिस्टीक कंपनी पळस्पेच्या मागील बाजूस असलेल्या कंपाऊंडमध्ये आढळून आला आहे.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ६० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट ७ इंच आहे. त्याचा रंग गोरा, चेहरा उभट, नाक सरळ असून केस काळे व पांढरे मिश्रित आहेत. उजव्या हाताच्या दंडावर इंग्रजी अक्षरातील टॅटू कोरलेला आहे. तसेच डाव्या हाताच्या मनगटावर हृदयाच्या आकाराचा टॅटू असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी किंवा त्याच्या नातेवाइकांबाबत माहिती असल्यास नागरिकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत तपास अधिकारी सपोनि प्रज्ञा मुंडे मो.नं. ७६६६११४८७४ येथे संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहासह शालेय साहित्य



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीए परिसरातील कार्यरत असलेल्या भवानी सिपिंग सर्व्हिस कंपनी संचालित भवानी फाउंडेशन यांच्या वतीने अंबरनाथ येथील कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेच्या नीजलिंगाप्पा कन्नड पीआर विद्यालयाच्या मुली–मुलांसाठी १० सीटचे स्वच्छतागृह बांधून देण्यात आले आहे. १० लाख रुपये खर्चून मुली–मुलांसाठी उभारण्यात आलेल्या या स्वच्छतागृहात भारतीय, इंग्लिश अशा दोन्हीही पद्धतीच्या पॉटची व्यवस्था करण्यात आली आहे.

सामाजिक बांधिलकीतून उभारण्यात आलेल्या या स्वतंत्र स्वच्छतागृहांमुळे विद्यालयातील मुलामुलींची होणारी गैरसोय दूर करण्यात मोठी मदत झाली आहे. या स्वच्छतागृहाचा लोकार्पण सोहळा नुकताच भवानी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष के. डी. शेट्टी, भवानी शिपिंगचे मॅनेजिंग डायरेक्टर जिक्सीत शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी भवानी फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष आर. बी. हेबली, सचिव शिखा शेट्टी, अंबिका हॉटेलचे मालक प्रभाकर शेट्टी, कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेचे अध्यक्ष टिळक चालवाडी, उपाध्यक्ष एच. एन. इंगनुर, सचिव बसवंत पुजारी, अन्य पदाधिकारी, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता राजोली, शिक्षक वृंद व मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, विद्यार्थिनींना वह्या, पुस्तके व शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले.

# रायगड जिल्ह्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

## सुहासिनींनी पतीच्या दीर्घायुष्यासाठी केली प्रार्थना

**कर्जत : प्रतिनिधी**

यंदा वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. आज सुट्टी नसल्याने चाकरमानी सकाळच्या सुमारास वटवृक्षाची पूजा करण्यासाठी बाहेर पडल्या. पाऊस लांबल्याने सुहासिनी अगदी संध्याकाळ पर्यंत मनोभावे वट वृक्षाची पूजा करीत होत्या. यंदा शाळा सुरु असल्याने मुलांना शाळेत सोडून येऊन काही सुहासिनींनी वट वृक्षाची पूजा केली तर काही सुहासिनींनी मुलांची शाळा दुपारी असल्याने सकाळीच पूजेचा मुहूर्त साधला.



यंदा अधिक महिन्यामुळे विवाह सोहळे अगदी काल – परवा पर्यंत पार पडत होते. त्यामुळे वटपौर्णिमेसाठी नव वधुंची संख्या मोठी होती. पारंपरिक वेशभूषा करून सुहासिनी वटवृक्षाला फेऱ्या मारण्यासाठी तयार होत्या. चार – पाच वर्षांपूर्वी तालुक्यातील बहुतांश रस्त्यांचे रुंदिकरण व चौपदरीकरण झाल्याने रस्त्या लगतची अनेक जूने वटवृक्ष तोडण्यात आल्याने सुहासिनींना वटवृक्षाची पूजा करण्यासाठी पायपीट करावी लागली. तर काही महिलांनी वटवृक्षाच्या फांद्या घरी आणून पूजा केली.

हल्लीच्या मोबाईलच्या जमान्यात काही सुहासिनींना सेल्फीचा मोह आवरता आला नाही. 'सात जन्मी हाच नवरा मिळू दे' अशी प्रार्थना पारंपारिक पद्धतीने करून वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कोंकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांनी दोन वर्षांपूर्वी लावलेल्या वट वृक्षाची पूजा करून फेऱ्या मारून वटपौर्णिमा साजरी केली.

## महिलांकडून पारंपरिक पद्धतीने वटवृक्षाची पूजा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यात यंदाची वटपौर्णिमा शहरी तसेच ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. सकाळपासूनच महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून पूजेचे साहित्य घेऊन वडाच्या झाडाखाली गर्दी केली होती.

हिंदू परंपरेनुसार अखंड सौभाग्य, पतीचे दीर्घायुष्य आणि कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी महिलांनी वडाच्या झाडाची विधीवत पूजा केली. यावेळी वडाच्या झाडाला सात फेऱ्या मारून "सात जन्मी हाच पती लाभो" अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. पूजा, आरती आणि धार्मिक विधींमुळे परिसरात भक्तिमय वातावरण झाले होते.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.



एकमेकींना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा देत पारंपरिक संस्कृतीचे जतन करण्याचा संदेशही देण्यात आला. महिलांमध्ये उत्साह, आनंद आणि धार्मिक श्रद्धेचे वातावरण सर्वत्र पाहावयास मिळाले.वटपौर्णिमेच्या निमित्ताने माणगाव तालुक्यातील विविध भागांमध्ये सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक परंपरा आणि कौटुंबिक मूल्यांचे दर्शन घडले. त्यामुळे यंदाची वटपौर्णिमा महिलांसाठी आनंदोत्सव ठरल्याचे दिसून आले.



## सौभाग्यासाठी महिलावर्गाने जपली परंपरा

**चौक : प्रतिनिधी**

पारंपारिक वटपौर्णिमा महिलांनी मोठ्या उत्साहात साजरी करून जन्मोजन्मी हाच पतीदेव मिळो अशी प्रार्थना करून वट वृक्षाला फेऱ्या मारल्या.

वट पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहेज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला विवाहित महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्य, आरोग्य आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी वटवृक्षाची (वड) पूजा करून हे व्रत साजरे करतात.वटपौर्णिमेचे महत्त्व सावित्री–सत्यवानाच्या पौराणिक कथेत आहे, या व्रतामागे सावित्री आणि सत्यवानाची पौराणिक कथा आहे. सावित्रीने आपल्या पतीचे प्राण यमराजा कडून परत मिळवले होते.त्याच पतिव्रतेच्या आठवणीत आणि त्यागाच्या सन्मानार्थ हे व्रत केले जाते.

वड हा वृक्ष दीर्घायुष्याचे, स्थिरतेचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. वडाच्या झाडात ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिन्ही देवांचा वास असतो अशी धार्मिक भावना आहे. खालापूर तालुक्यातील सौभाग्यवती महिलांनी हे व्रत केले. सुवासिनींनी एकमेकींना वाण देत शुभेच्छांची देवाण घेवाण केली.

## मौल्यवान ऐवजाची पिशवी आदिवासी महिलेला केली परत

### व्यापाऱ्याचा प्रामाणिकपणा

**पाली : प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात प्रामाणिकपणा व माणुसकीची जपणूक करणारी माणसे अजूनही समाजात आहेत, याची प्रचिती पालीतील व्यापारी सागर मेहता यांनी दिली. भावशेत (सिद्धेश्वर) येथील आदिवासी महिला कमळी वारगुडे यांची हरवलेली पिशवी त्यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय शोधून तिच्या मालकिणीपर्यंत सुखरूप पोहोचवून समाजासमोर आदर्श निर्माण केला.



कमळी वारगुडे यांची पिशवी हरवली होती. त्या पिशवीमध्ये त्यांनी कष्टाने घेतलेली सोन्याची नथ, १,५०० रुपयांची रोख रक्कम तसेच आधार कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रे होती. पिशवी हरवल्याने त्या चिंतेत होत्या. विशेषतः काबाडकष्ट करून विकत घेतलेली सोन्याची नथ हरवल्याने त्यांना मोठा मानसिक धक्का बसला होता.

दरम्यान, ही पिशवी व्यापारी सागर मेहता यांना सापडली. त्यांनी पिशवीतील आधार कार्ड पाहून ती नेमकी कोणाची आहे, याची खातरजमा केली. आधार कार्डावरील माहितीनुसार संबंधित व्यक्तीचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांनी फोनद्वारे चौकशी केली. पिशवी भावशेत (सिद्धेश्वर) येथील आदिवासी महिला कमळी वारगुडे यांची असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी त्यांना संपर्क साधून, "आपली पिशवी सुरक्षित सापडली आहे, येऊन घेऊन जा," असे सांगितले.

हरवलेली सोन्याची नथ, रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे जशीच्या तशी परत मिळाल्याने त्यांनी व्यापारी सागर मेहता यांचे मनापासून आभार मानले. त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.सागर मेहता यांच्या या कृतीमुळे "अजूनही माणुसकी शिल्लक आहे" हे दिसून आले.


## रस्ते विकासासाठी मंत्री भरत गोगावलेंचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रस्ते विकास, वाहतूक सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांना गती मिळावी यासाठी राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री तथा महाड–माणगाव–पोलादपूर मतदारसंघाचे आमदार नामदार भरतशेठ गोगावले यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे सदिच्छा भेट घेत विविध महत्त्वपूर्ण विकास कामांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या भेटीदरम्यान रायगडच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या अनेक प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली असून संबंधित विषयांवर कार्यवाही करण्याबाबत केंद्रीय मंत्र्यांनी अनुकूल भूमिका दर्शविली.

रायगड जिल्ह्यातील नागरिकांना दैनंदिन प्रवासादरम्यान भेडसावणाऱ्या अडचणी, वाढती वाहतूक कोंडी, अपघातप्रवण ठिकाणे, ग्रामीण भागातील संपर्क रस्त्यांची दुरवस्था तसेच भविष्यातील विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध पायाभूत सुविधा याबाबत मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले.

या बैठकीत विशेषतः काशेडी घाट बोगदा प्रकल्पांतर्गत मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर स्थानिक ग्रामस्थांच्या सोयीसाठी रस्ता दुभाजक उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. कातली, कामतवाडी, कशेडी आणि भोगाव बुद्रुक परिसरातील नागरिकांना शेतजमिनी, घरे आणि दैनंदिन कामांसाठी सध्या तीन ते चार किलोमीटरचा अतिरिक्त प्रवास करावा लागत असल्याने मोठी गैरसोय होत आहे. सुरक्षिततेचे सर्व निकष पाळून या ठिकाणी दुभाजक उभारल्यास स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार



असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६, १६६ (एफ) आणि ९६५ (डीडी) अंतर्गत विविध विकासकामांना मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. यामध्ये महाड, माणगाव आणि पोलादपूर तालुक्यातील विविध ठिकाणी सेवा रस्ते, वाहनांसाठी भूमिगत मार्ग, पुलाखालील मार्गांचे रुंदीकरण, पादचारी पूल, प्रवासी निवारा केंद्रे, पदपथ तसेच रस्ते सुरक्षेसाठी संरक्षण भिंती उभारणे, घाटमार्गांवरील उतारांचे संरक्षण, दरड प्रतिबंधक उपाययोजना आणि सावित्री नदीलगतच्या संवेदनशील भागांमध्ये संरक्षणात्मक कामांचा समावेश आहे.

दिघी बंदराच्या वाढत्या औद्योगिक महत्त्वाचा विचार करून भविष्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठीही महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आले. पुणे–दिघी बंदर राष्ट्रीय महामार्गाचे दोन पदरी मार्गावरून चौपदरीकरण, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील इंदापूर आणि माणगाव वळण मार्गालगत अतिरिक्त चौपदरी जोडमार्गांची उभारणी तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ (एफ) आणि ५४८ (ए) यांना जोडणाऱ्या सुमारे १८०० मीटर लांबीच्या खाडी पुलाच्या उभारणीचा प्रस्ताव यावेळी मांडण्यात आला. या प्रकल्पांमुळे दिघी बंदराची संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होऊन औद्योगिक विकास, मालवाहतूक, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास मंत्री गोगावले यांनी व्यक्त केला.

याशिवाय रायगड जिल्ह्यातील प्रलंबित राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना गती देण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील उर्वरित कामांसाठी नव्या कंत्राटदाराची तातडीने नियुक्ती करून कामे जलदगतीने पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी मांडलेल्या सर्व मागण्या आणि विकास प्रस्ताव गांभीर्याने ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्याबाबत सकारात्मक चर्चा केली.

## उतेखोल केंद्रातील विद्यार्थ्यांना बेटर सोसायटी फाउंडेशनमार्फत वह्यावाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील गांगवली –खरबाचीवाडी येथील बेटर सोसायटी फाउंडेशनमार्फत माणगाव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल केंद्रातील उतेखोल,चव्हाणवाडी,खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी, उतेखोल आदिवासीवाडी या चार शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला.

सोमवार दि.२९ जून रोजी माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे,उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे,बेटर सोसायटी फाउंडेशनच्या संस्थापिकाअध्यक्षामंजुषा गोटकर,फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अनिल वनगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत राजिप केंद्र शाळा उतेखोल आदिवासीवाडी येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी



उपस्थित सर्व मान्यवरांचे उतेखोल केंद्रातील शिक्षकांतर्फे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे यांनी सुरवातीला बेटर सोसायटी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, बेटर सोसायटी फाउंडेशनसारखी समाजात सेवाभावी वृत्तीने काम करणारी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील संस्था गरीब गरजू विद्यार्थ्यांना,नागरिकांना मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकी जपत आहे.

## कार–दुचाकीच्या अपघातात कशेळेतील तरुणाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील तरुण मयूर पवार याचा खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेडवली येथे झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. कार आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत मयूर गंभीर जखमी झाला होता. शनिवार २७ जून रोजी रात्री ९ वाजता ही घटना घडली होती.

अपघाताची माहिती मिळताच खालापूर येथील हेल्प फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत रुग्णवाहिकेद्वारे त्याला प्रथम खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी मोहिते हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

या घटनेमुळे कशेळे परिसरात शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे, गेल्याच आठवड्यात खालापूर तालुक्यात झालेल्या अपघातांमध्ये कर्जत तालुक्यातील तीन तरुणांचा मृत्यू झाला होता.

## नेरळ विद्यामंदिरात संगणक कक्षाची उभारणी

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई मलबार हिलमधील रोटरी क्लबच्या माध्यमातून नेरळ विद्यामंदिर शाळेला सुमारे चाळीस लाख रुपये खर्च करून अत्याधुनिक संगणक कक्षाची उभारणी करण्यात आली. या कक्षाचे उदघाट्न करण्यात आले. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

विद्या मंदिर मंडळाच्या विनंतीनुसार नेरळ – ममदामपूर येथील नाडकर्णी आजी शैक्षणिक संकुलात संगणक कक्ष उभारण्यात आला आहे. या संगणक कक्षाच्या उदघाट्न सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेश डोंगरे यांच्या हस्ते संगणक कक्षाचे उदघाट्न करण्यात आले. संस्थेच्या कार्याध्यक्ष शशिकला मुळे, संयुक्त सचिव विवेक पोतदार, रोटरीचे सुनील तलवार आदी उपस्थित होते.




**अलिबाग : पतीच्या दीर्घायुष्याची आणि जन्मोजन्मीचे नाते अखंड राहावे यासाठी महिलांनी सोमवारी वटपौर्णिमेनिमित्त वडाच्या वृक्षाला पवित्र धागे गुंफून, पाच प्रकारच्या फळांचा नैवेद्य अर्पण करत पारंपरिक पद्धतीने पूजा केली. यावेळी महिलांनी मोठ्या उत्साहात वटपौर्णिमा साजरी केली**

## आरोग्यवर्धक अन् चविष्ट मुठ्यांची मेजवानी!

### पावसाच्या सुरुवातीला खवय्यांची पहिली पसंती

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात पावसाला काही दिवसांपूर्वीच दमदार सुरुवात झाली असून, यामुळे फक्त पावसाच्या सुरुवातीला फक्त रायगडसह कोकणात मिळणाऱ्या 'मूठ्यांचे' (खेकड्याची एक वैशिष्ट्यपूर्ण जात) आगमन झाले आहे. निसर्गाचा हा रानमेवा खवय्यांसाठी पर्वणी ठरत आहे. आरोग्यवर्धक, चविष्ट व लज्जतदार मूठ्यांना खाण्यासाठी खवय्ये आतुर झाले असून, गावागावांत रात्रीच्या वेळी मुठे पकडण्याची अनोखी लगबग व मज्जा पाहायला मिळत आहे.



पहिल्या पावसाच्या सरींमुळे माळरान, शेत आणि डोंगरउतारावरील जमीन ओली झाली असून कोवळे गवत डोलू लागले आहे. याच कोवळ्या गवतावर गुजरान करणारे मूठे रात्रीच्या वेळी रिमझिम पावसात बिळातून बाहेर पडतात. हातात टॉर्च, गॅस बत्ती किंवा जळता टायर घेऊन आणि सोबत प्लास्टिकची बादली वा गोणपाट घेऊन ग्रामीण भागातील लोक रात्रीचे मुठे पकडण्यासाठी बाहेर पडतात. प्रकाशझोतात जागच्या जागी थांबणाऱ्या या मूठ्यांना दबक्या पावलांनी जाऊन पकडणे हा एक रंजक अनुभव असतो.

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मूठ्यांचा रंग तजेलेदार काळा–पिवळा असतो. यांचा पाठीचा भाग गोलाकार आणि चकाकणारा असून, पाय पांढरे–पिवळे असतात. एक नांगडा मोठा तर एक लहान, अशी यांची वैशिष्ट्यपूर्ण ठेवण असते. मूठ्यांचे मांस अत्यंत चविष्ट व आरोग्यवर्धक मानले जाते. याचे कवच काढून त्यात मूग, तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते व पुन्हा धाग्याने बांधून रस्सा (कालवण) केला जातो. ही पारंपरिक पद्धत खवय्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. मूठे आणि चिंबोऱ्या विकून स्थानिक आदिवासी बांधवांना दोन पैसे मिळतात. अनेक जण मुंबई–पुण्यातील नातेवाईकांना ही हक्काची भेट म्हणून पाठवतात.



**मुरूड : वटपौर्णिमेनिमित्त राजपुरी गावातील महिलांनी समुद्रकिनारी असलेल्या वडाच्या झाडाचे पूजन केले.**

# कॅनडाची ‘राऊंड १६’मध्ये धडक

## अखेरच्या क्षणी युस्टाकिओने भेदला आफ्रिकेचा बचाव

**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील राउंड ३२ फेरीतील पहिल्या सामन्यात यजमान कॅनडाने रोमहर्षक लढतीत दक्षिण आफ्रिकेचा १-० असा पराभव करत पुढच्या फेरीत धडक मारली. १९८६मध्ये पहिल्यांदा वर्ल्डकपसाठी पात्र ठरलेला कॅनडा २०२२मध्ये वर्ल्डकप खेळला होता, मात्र यंदा प्रथमच अंतिम १६ संघांमध्ये स्थान मिळवत त्यांनी इतिहास रचला आहे.



लॉस एंजेलिसमधील सोफी स्टेडियम येथे रंगलेल्या या सामन्यात सुरुवातीपासूनच दक्षिण आफ्रिकेने आक्रमक खेळ केला आणि अनेक चांगल्या चाली रचल्या, पण अंतिम पास आणि फिनिशिंगच्या अभावामुळे त्यांना आघाडी मिळवता आली नाही. दुसरीकडे कॅनडाने काही उत्कृष्ट संधी निर्माण केल्या. पहिल्या हाफच्या शेवटच्या क्षणांमध्ये कॅनडा दोनदा गोल करण्याच्या अगदी जवळ पोहचला होता. सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेचा बचावपटू ऑब्रे मोडिबाने मोईस बॉम्बिटोचा हेडर गोल रेषेवरून बाहेर काढला. त्यानंतर लगेचच गोलरक्षक रॉनवेन विल्यम्सने ताजोन बुकाननच्या शॉटवर एक अप्रतिम बचाव करत आपल्या संघाला गोल होण्यापासून वाचवले. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ ०-० असे बरोबरीत होते.

९० मिनिटांनंतर दोन्ही संघ गोलशून्य बरोबरीत होते, मात्र इंज्युरी टाइममधील दुसऱ्याच मिनिटाला स्टीफन अँट्युन्स युस्टाकिओ याने दक्षिण आफ्रिकेचा बचाव भेदत वर्ल्डकपमधील आपला पहिला गोल नोंदवला. या गोलच्या जोरावर कॅनडाने ऐतिहासिक कामगिरीसह यंदाची वर्ल्डकप स्पर्धा अविस्मरणीय ठरवली. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेचा प्रवास संपुष्टात आला.

सामना अतिरिक्त वेळ आणि कदाचित पेनल्टी शूटआउटकडे जाईल, असे वाटत असतानाच इंज्युरी टाइममध्ये कॅनडाने निर्णायक गोल करत १-० असा विजय मिळवला आणि पुढच्या फेरीत धडक मारली.

# राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

## बडेकर भगिनी चमकल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबाद येथील जीएमसी स्टेडियममध्ये २३ ते २८ जूनदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या इक्विप्ड सब-ज्युनिअर व ज्युनिअर राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले.



कर्जतच्या आयएनडी क्लबची गायत्री महेश बडेकर हिने ४७ किलो (सब-ज्युनिअर) वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत १५५.५ किलो स्क्वॅट (राष्ट्रीय विक्रमासह) ७२.५ किलो बेंच प्रेस आणि १५०.५ किलो डेडलिफ्ट (राष्ट्रीय विक्रमासह) असे एकूण ३७८.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले तसेच तिला "स्ट्राँग वूमन ऑफ इंडिया सब ज्युनिअर" हा मानाचा किताबही प्राप्त झाला.

जिज्ञासा महेश बडेकर हिने ६९ किलो सब-ज्युनिअर वजनी गटात १४२.५ किलो स्क्वॅट, ५० किलो बेंच प्रेस आणि १२० किलो डेडलिफ्ट असे एकूण ३१२.५ किलो वजन उचलून कांस्यपदक मिळवले. गायत्री बडेकर आणि जिज्ञासा बडेकर या भगिनींना आय एनडी क्लब कर्जतचे राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात यांचे प्रशिक्षण लाभले.

याशिवाय पनवेलजवळील दापोली पारगावच्या सुप्रसिद्ध चेतन जिमकोच्या रौनक रोशन जितेकर याने १०५ किलो सब-ज्युनिअर वजनी गटात २८८ किलो स्क्वॅट (राष्ट्रीय विक्रम), १५० किलो बेंच प्रेस आणि २६५.५ किलो डेडलिफ्ट (राष्ट्रीय विक्रम) असे एकूण ७०३.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. रौनक जितेकर याला राष्ट्रीय खेळाडू विशाल मुळ्ये (भांडुप, मुंबई) यांचे विशेष प्रशिक्षण आहे. यामुळे स्पर्धेत गायत्री बडेकर आणि रौनक जितेकर यांच्या नावे नवीन राष्ट्रीय विक्रमाची नोंद झाली.

या स्पर्धेसाठी रायगडचे अंजली येवले, राज कडू, प्रथमेश भालेकर, मोरेश कारळे आणि आणि विशाल मुळ्ये यांची मोलाची मदत खेळाडूंना झाली. राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्ह्याचे नाव गौरवाने उंचावले.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे, माधव पंडित, खजिनदार राहुल गजरमल, संघटना सहाय्यक रामचंद्र गावडे आणि महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई यांनी पदकप्राप्त खेळाडूंचे आणि त्यांचे प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले.

# भारताचे टी-२० वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात

## ऑस्ट्रेलियाकडून पराभव

**लंडन : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाने भारताचा सहा विकेट्सनी पराभव करत स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आणले. या विजयासह ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांनी सेमीफायनलमध्ये प्रवेश केला, मात्र भारताच्या बाहेर पडण्यामागे केवळ ऑस्ट्रेलियाविरुद्धचा पराभव नव्हे, तर सहा दिवसांपूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या महत्त्वाच्या चुकादेखील कारणीभूत ठरल्या.



भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत १७० धावा उभारल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरने ५६ धावा केल्या, तर स्मृती मंधानाने ३८, शेफाली वर्माने ३४ आणि जेमिमा रॉड्रिग्सने ३४ धावांचे योगदान दिले.

१७१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. रेणुका सिंहने जॉर्जिया वॉलला अवघ्या ४ धावांवर बाद केले. त्यानंतर श्री चरणीने फोबी लीचफिल्डला २४ धावांवर आणि बेथ मुनीला २२ धावांवर बाद करत ऑस्ट्रेलियाची अवस्था ३ बाद ६८ अशी केली. त्यामुळे भारताच्या विजयाच्या आशा बळावल्या होत्या.

एलिस पेरी आणि ॲशले गार्डनर यांनी चौथ्या विकेटसाठी जवळपास १०० धावांची भागीदारी करत सामना भारताच्या हातातून हिसकावून घेतला. पेरीने ५६ धावा केल्या, तर गार्डनर ५३ धावांवर नाबाद राहिली. अखेरीस ऑस्ट्रेलियाने सहा विकेट्स राखून विजय मिळवला.

भारताच्या स्पर्धेतील बाहेर पडण्यामागे दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पराभवही तितकाच महत्त्वाचा ठरला. त्या सामन्यात भारताने दिलेल्या १५८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मॅरिझान कॅपने ८१ धावांची नाबाद खेळी करत दक्षिण आफ्रिकेला सहा विकेट्सनी विजय मिळवून दिला होता. या सामन्यात भारतीय क्षेत्ररक्षकांनी मॅरिझानचे तब्बल तीन झेल सोडले. या तीनपैकी एक जरी झेल पकडला गेला असता, तर सामन्याचा निकाल बदलू शकला असता.

# बॅडमिंटनपटू किदांबी श्रीकांतच्या खिलाडूवृत्तीने जिंकली प्रेक्षकांची मने



**कॅलिफोर्निया : वृत्तसंस्था**

भारताचा माजी जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाचा बॅडमिंटनपटू किदांबी श्रीकांतने यूएस ओपन स्पर्धेत केवळ आपल्या खेळानेच नव्हे, तर खिलाडूवृत्तीनेही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.

कॅलिफोर्नियातील टायटन जिममध्ये झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपांत्य सामन्यात श्रीकांतने जपानच्या युदाई ओकिमोतोवर २२-२०, १५-२१, २१-१९ असा विजय मिळवला. या विजयासह श्रीकांतने गेल्या नोव्हेंबरनंतर प्रथमच बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

सामन्याच्या निर्णायक सेटमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आला. नेटजवळच्या एका एक्सचेंजमध्ये श्रीकांतने केलेला शॉट इन (आत) असल्याचे पंचांनी घोषित केले, मात्र रिप्लेमध्ये शटल लाईनच्या बाहेर पडल्याचे दिसत होते. ओकिमोतोने पंचांच्या निर्णयाला विरोध करत रिव्ह्यूची मागणी केली, परंतु ती फेटाळली गेली.

ओकिमोतो हताश झालेला असताना श्रीकांतने स्वतः पुढाकार घेतला आणि पंचांना धावपट्टीच्या बाहेर पडलेल्या शटलबाबत माहिती दिली. त्यानंतर पंचांनी आपला निर्णय बदलून ओकिमोतोला गुण दिला. श्रीकांतच्या या खिलाडूवृत्तीचे उपस्थित प्रेक्षकांनी मोठ्या उत्साहात कौतुक केले.

# आयर्लंडचा टीम इंडियाला दे धक्का!

## टी-२० मालिकेत ऐतिहासिक विजय

**बेलाफास्ट : वृत्तसंस्था**

भारताला आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अवघ्या एका धावेने पराभव स्वीकारावा लागला. या पराभवासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ०-२ अशा फरकाने मालिका गमावली. विशेष म्हणजे, तब्बल १०५० दिवसांनंतर भारताने टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका गमावली आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२३मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध भारताचा मालिका पराभव झाला होता.



प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडने २० षटकांत ८ बाद १५४ धावा केल्या होत्या. हॅरी टेक्टरने अर्धशतकी खेळी केली, तर बेंजामिन कॅलिट्झने ३७ धावांचे योगदान दिले. १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात निराशाजनक झाली. तिलक वर्माने ४६ चेंडूत ५५ धावांची झुंजार खेळी करत संघाला विजयाच्या जवळ नेले, मात्र अखेरच्या चेंडूवर प्रिन्स यादवने षटकार ठोकूनही भारत २० षटकांत ९ बाद १५३ धावांपर्यंतच मजल मारू शकला आणि संघाने अवघ्या एका धावेने सामना गमावला.

आयर्लंडने या विजयासह इतिहास रचला. कोणत्याही प्रकारात भारताविरुद्धची ही त्यांची पहिलीच मालिका जिंकण्याची कामगिरी ठरली. पहिल्या सामन्यात ३४ धावांनी विजय मिळवल्यानंतर दुसऱ्या सामन्यातही त्यांनी भारतावर मात करत मालिका २-० अशी जिंकली.

### आयपीएलचा फटका?

आयर्लंडमधील खेळपट्ट्या, हवामान आणि मैदानाचे आकारमान भारतीय खेळाडूंसाठी आव्हानात्मक ठरले. कमी सरावामुळे खेळाडूंना स्थानिक परिस्थितीशी योग्य प्रकारे जुळवून घेता आले नाही. त्यातच भारतीय फलंदाजांनी आयपीएलप्रमाणे मोठे फटके खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र बेलफास्टच्या संथ आणि स्विंग मिळणाऱ्या खेळपट्टीवर संयमी आणि तांत्रिक फलंदाजी आवश्यक होती. तरीही अनेक फलंदाजांनी परिस्थितीनुसार खेळात बदल केला नाही. त्यामुळे भारताला मालिकेत मोठी किंमत मोजावी लागली.

# आरटीएचएसव्हीच्या श्रेयस पुकाळेला सुवर्णपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा (आरटीएचएसव्ही) विद्यार्थी श्रेयस मोहन पुकाळे याने राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. याचबरोबर त्याची इटली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाकडून नुकतीच ओडिशातील खुर्दा येथे राष्ट्रीय किक-बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात श्रेयस पुकाळे याने सुवर्णपदक जिंकले. त्याला क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्रेयसचे अभिनंदन करून पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य निशा नायर याही उपस्थित होत्या.

# टी-२० विश्वचषकात रंगणार सेमी फायनलचा थरार; चार संघ ठरले!

**लंडन : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ आता आपल्या सर्वात रोमांचक टप्प्यात दाखल झाला आहे. गट फेरीचे सामने पूर्ण झाल्याने उपांत्य फेरीतील चार संघ निश्चित झाले आहेत. सहा वेळचे विजेते ऑस्ट्रेलिया, यजमान इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांनी अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.

लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट्स राखून पराभूत करुन 'अ' गटात अव्वल स्थान मिळवले. कर्णधार सोफी मोलिन्यूच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियन संघाने गट फेरीतील सर्व पाच सामने जिंकून १० गुणांसह उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. दरम्यान, भारतीय संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सामना २०१६च्या विजेत्या वेस्ट इंडिजशी होईल. दुसऱ्या उपांत्य सामन्यात इंग्लंडचा सामना द.आफ्रिकेशी होईल.




# दीप्ती शर्माचा नवा विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दीप्ती शर्माने महिला क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव सोनेरी अक्षरात लिहिले आहे. महिला टी-२० विश्वचषकातील ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या सामन्यात दीप्तीने एक विकेट घेत दिग्गज झुलन गोस्वामीचा विक्रम मोडून नवा इतिहास रचाला आहे.

दीप्ती ऑस्ट्रेलियाच्या डावातील दहावे षटक टाकण्यासाठी आली आणि तिने पहिल्याच चेंडूवर बेथ मुनीला बाद करत संघाला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवला. ही विकेट मिळवत ती महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ३५६ विकेट्ससह पहिल्या स्थानावर पोहचली आहे. भारताचीच झुलन आता ३५५ विकेट्ससह दुसऱ्या स्थानी आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com